बुधवार, 10 ऑगस्ट 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 16
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 10 AUGUST 2022 adhunikkesari.com Adhunik Kesari ● YEAR-02 ● ISSUE-16 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## बिहारमध्ये दुसरा राजकीय भूकंप

### नितीश कुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**पटणा : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राज्यपालांची भेट घेतल्यानंतर नितीश कुमार यांनी आपला राजीनामा त्यांच्याकडे सोपवला. नितीश कुमार यांच्या जेडीयूने एनडीएसोबतची युती तोडत भाजपाला मोठा धक्का दिला होता. त्यानंतर आता नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर भाजपाला दुसरा मोठा धक्का बसला आहे.**

नितीश कुमार यांच्या राजीनाम्यानंतर आता बिहारमधील समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. आज नितीश कुमार यांच्या घरी जेडीयूच्या खासदार आणि आमदरांची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीनंतर त्यांनी हा निर्णय घेतला आहे. भाजपा आणि जेडीयूची युती तुटल्यानंतर नितीश कुमार लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल पक्षासोबत युती करत नवीन सरकार स्थापन करणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राष्ट्रीय जनता दल आणि जेडीयूच्या युतीला काँग्रेसने यापूर्वीच पाठिंबा दर्शवला होता. या नव्या सरकारमध्ये नितीश कुमारच मुख्यमंत्री असतील असेही सांगण्यात येत आहे.

दोन वर्षांपूर्वीच भाजपा आणि जेडीयू पक्षाने युती केली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून नितीश कुमार आणि भाजपामध्ये सुरु असलेला वाद शिगेला पोहचला होता. अखेर नितीश कुमारांना आपल्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देत बिहारमध्ये राजकीय भूकंप घडवून आणला आहे.



**नीति आयोगाच्या बैठकीला अनुपस्थित**

नुकत्याच पार पडलेल्या नीति आयोगाच्या बैठकीला नितीश कुमार अनुपस्थित होते. मागील एक महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीतही नितीश कुमार दुसऱ्यांदा गैरहजर राहिले होते. त्यामुळे नितीश कुमार आणि केंद्र सरकारमध्ये मतभेद असल्याचा मुद्दा ऐरणीवर आला होता. त्यामुळे कोणत्याही क्षणी बिहारमधील सत्ताधारी भाजपा - जदयूमधील युती तुटेल, याबाबत तर्क वितर्क लावले जात होते. अखेर नितीश कुमार यांनी भाजपासोबतची युती तोडल्याची घोषणा केली आणि आता मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देत भाजपाला धक्का दिला आहे.

**पुन्हा महागठबंधन!**

संयुक्त जनता दलाचे (जेडीयू) अध्यक्ष नितीशकुमार यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाचा राजीमाना दिला आहे. नितीशकुमार यांच्या या निर्णयामुळे येथे नवे सत्तासमीकरण जुळून येण्याची शक्यता आहे. तसे संकेत खुद्द नितीशकुमार यांनी दिले आहेत. नितीश कुमार यांनी राष्ट्रीय जनता दल तसेच अन्य मित्रपक्षांसोबत महागठबंधन करून सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. महागठबंधनमध्ये एकूण सात पक्ष आहेत. महागठबंधनमधील सर्व पक्षांचे एकूण १६४ आमदार आहेत. या सर्व आमदारांच्या समर्थनाचे पत्र आम्ही राज्यपालांना सोपवले आहे. तसेच सत्तास्थापनेचा दावा केला आहे.

## चर्चेतली बातमी

### पंतप्रधान मोदींसह १० केंद्रीय मंत्र्यांची संपत्ती जाहीर



आधुनिक केसरी न्यूज

**नवीदिल्ली :** पंतप्रधान कार्यालयाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संपत्ती जाहीर केली आहे. यासोबतच अन्य १० मंत्र्यांच्या संपत्तीचा तपशीलही सार्वजनिक करण्यात आला आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चल संपत्तीत २६.१३ लाख रुपयांची वाढ झाली आहे. यासोबतच पीएम मोदी यांच्या नावे गुजरातमध्ये एका निवासी भूखंडही आहे. मार्च २०२१ अखेर पंतप्रधान मोदींची चल संपत्ती १,९७,६८,८८५ रुपये होती. ती मार्च २०२२ अखेरीस २,२३,८२,५०४ रुपये इतकी वाढली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नावावर गुजरामध्ये एक निवासी भुखंड आहे. या भुखंडाचे बाजार मुल्य १.१० कोटी रुपये आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह इतर १० मंत्र्यांची संपत्तीही सार्वजनिक करण्यात आली आहे. यामध्ये राजनाथ सिंह, आरके सिंग, धर्मेंद्र प्रधान, हरदीप सिंग पुरी, जी किशन रेड्डी, ज्योतिरादित्य सिंधिया, पुरुषोत्तम रुपाला, व्ही मुरलीधरन, फगन सिंग कुलस्ते यांचाही समावेश आहे.

## महत्त्वाची बातमी

### ‘तीन दिवसात बॉम्बने उडवून देऊ’; योगींना धमकी



आधुनिक केसरी न्यूज

**लखनौ :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. तीन दिवसांमध्ये बॉम्बने उडवून देऊ, असा धमकीवजा संदेश आदित्यनाथ यांना सोशल मीडियावर देण्यात आला आहे. या धमकीनंतर उत्तर प्रदेश पोलिसांमध्ये खळबळ उडाली असून या प्रकरणी तपास सुरू आहे. उत्तर प्रदेशच्या मुख्यालयाच्या ११२ या व्हॉटस्‌ॲप नंबरवर एक मेसेज आला होता. त्यामध्ये योगी आदित्यनाथ यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. पोलिसांनी तपास केल्यानंतर हा नंबर शाहिद खान नावाच्या व्यक्तीचा असल्याचे समोर आले आहे. या धमकीनंतर उत्तर प्रदेश पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. व्हॉटस्‌ॲप नंबरच्या आधारे पोलीस आरोपीचे लोकेशन शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मुख्यमंत्र्यांना धमकी दिल्याप्रकरणी लखनऊच्या गोल्फ सिटी ठाण्यात आरोपी शाहिद खानवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आठवा वेतन आयोग स्थापन करण्यासंदर्भात प्रस्ताव नाही : केंद्रीय अर्थराज्यमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्यासाठी सध्या कोणतीही योजना नसल्याची माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत दिली आहे. आठवा वेतन आयोग स्थापन करण्यासंदर्भात एका खासदाराने विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना अशाप्रकारचा कुठलाही प्रस्ताव विचाराधीन नसल्याचे चौधरी यांनी लोकसभेत बोलताना सांगितले.

महागाईमुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारांमध्ये निर्माण झालेली तूट भरून काढण्यासाठी या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्यात येतो. महागाईच्या दरानुसार प्रत्येक सहा महिन्यांनी महागाई भत्त्यामध्ये वाढ करण्यात येत असल्याची माहिती चौधरी यांनी संसदेत दिली आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या अखिल भारतीय ग्राहक निर्देशांकानुसार हा भत्ता ठरवण्यात येत असल्याचे अर्थ राज्यमंत्र्यांनी संसदेत सांगितले.

या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत महागाई भत्त्यामधील वाढीची केंद्रीय कर्मचारी आतुरतेने वाट पाहत आहेत. महागाईचा दर स्थिरावल्यानंतर सर्व केंद्रीय कर्मचारी आणि पेंशन धारकांना वाढीव महागाई भत्ता देण्यासंदर्भात लवकरच मंत्रिमंडळाकडून निर्णय घेतला जाणार आहे. ही वाढ तीन ते चार टक्क्यांपर्यंत असण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. देशातला महागाई दर सध्या सात टक्क्यांवर आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार जुलै २०२१ मध्ये केंद्र सरकारने महागाई भत्त्यामध्ये १७ ते २८ टक्क्यांची भरघोस वाढ केली होती. त्यानंतर पुन्हा ऑक्टोबर २०२१ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने तीन टक्क्यांनी महागाई भत्ता वाढवला होता. ही वाढ १ जुलै २०२१ पासून लागू करण्यात आली होती. जानेवारी २०२२ मध्ये परत एकदा केंद्र सरकारने महागाई भत्त्यामध्ये तीन टक्क्यांची वाढ केली होती. सध्या सर्व केंद्रीय कर्मचाऱ्यांना एकुण ३४ टक्के महागाई भत्ता मिळत आहे. ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६५ लाख पेंशन धारकांना याचा लाभ मिळत आहे.

## खातेदारांना धोक्यात टाकणाऱ्या 8 बँकांना दणका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकने आठ भारतीय बँकांना आर्थिक दंड ठोठावला आहे. या डिफॉल्टर यादीत महाराष्ट्रातील बँकांचाही समावेश आहे. या कारवाईत गुजरातच्या मेहसाणा अर्बन को-ऑपरेटिव बँक वर ४० लाख रुपयांचा सर्वात जास्त दंड लगावण्यात आला असून इतर बँकांना तब्बल १- ४०लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात आला आहे. शिवाय, आरबीआय ने स्पंदना स्फूर्ती फायनान्शियल या NBFC ला आर्थिक दंड लगावला आहे.

महाराष्ट्रातील दोन बँकांना आरबीआय कडून दंड लगावण्यात आला आहे. यामध्ये वरुद अर्बन को ऑपरेटिव्ह बँक व द यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा समावेश आहे. नागरी सहकारी बँकांना केव्हायसी जारी केलेल्या आरबीआयच्या ‘KNOW YOUR CUSTOMER’ निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल द यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला ३.५० लाख रुपयांचा तर वरुद अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला १ लाखाचा दंड सुनावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकने दंड ठोठावलेल्या बँक छत्तीसगड राज्य सहकारी बँक, गोवा राज्य सहकारी बँक, गराहा सहकारी बँक, द यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, जिल्हा सहकारी केंद्रीय बँक, छिंदवाडा, वरुद अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, इंदापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक मेहसाणा अर्बन आठ बँकांमध्ये सहकारी बँक.

द यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ३१ मार्च २०२० पर्यंतच्या आर्थिक स्थितीवर आधारित तपासणी अहवालानंतर, बँकेने तिच्या ग्राहकांच्या केव्हायसी नियतकालिक अपडेट केले नसल्याचे उघड झाले तसेच नियतकालिक रिव्ह्यूची कोणतीही प्रणाली बँकेत उपलब्ध नसल्याचे सुद्धा समोर आले. आरबीआय केवायसी निर्देशांचे उल्लंघन केल्यामुळे खातेधारकांची बचत जोखमीत टाकल्याने आरबीआयने बँकेवर कारवाई केली आहे. तर दुसरीकडे, वरुद अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या बाबत इंटर-बँक प्रतिपक्ष मर्यादेचे व केव्हायसी वरील आरबीआयच्या निर्देशांचे उल्लंघन केल्याने संशयास्पद व्यवहारांची शक्यता ओळखून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिली आहे.

## बेरोजगारी आणि राजकारण गेले घातकतेच्या वळणावर...

आधुनिक केसरी

आज आमच्या देशाचे राजकारण मोठ्या विद्रुप अवस्थेला पोहचलेले आहे. एकीकडे सत्तेची खुर्ची मिळविण्यासाठी मंत्री आपापसात जाती, धर्माच्या नावावर सामान्य जनतेला भुलविण्याचे काम करीत आहेत. एकीकडे राजकारण आणि दुसरीकडे बेरोजगारीच्या खाईत जगत असलेली आजची युवापिढी आणि त्यांच्यासमोर उभ्या असलेल्या समस्या यांचा कुठेच ताळमेळ बसत नाही. त्यामुळे युवकांनी आज खरेच शिक्षण घ्यावे काय? हा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण त्यांना आपल्यापेक्षा वयाने मोठी असलेली मुले संसाराचा गाडा निट उभा करू शकले नाही तर आपण शिकून काय करावे? या विचाराने ग्रासलेले दिसतात. शिवाय वाढत जाणारे वय आणि राजकारणातील हेवेदावे यामध्ये तरुण पूर्णपणे पिचल्या जात आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून खूप जागा निघाव्या आणि त्यामध्ये आपण नोकरीला लागणार अशी परिस्थिती आज दिसत नाही. कारण शासनाने नोकरीसाठी जागा काढणेच बंद केले आहे. जे व्यक्ती नोकरीवर आहेत त्यांनाच नोकरीवरून काढण्याची कटकारस्थाने केली जातात. त्यातही दिवसेंदिवस बदलणारी धोरणे बेरोजगारीत जगणाऱ्या युवकांसाठी घातक ठरताना दिसतात.



डॉ. अनंता सूर

आज मोठ्या प्रमाणावर जी पदे काबीज केलेली आहेत ती केवळ अल्पसंख्याकानीच. त्यामुळे बहुसंख्याकांना मात्र खालची पदे वाट्याला येतात. याचाच दुसरा अर्थ गरिबांच्या मुलांनी मोठ्या पदाची स्वप्नेच पाहू न देण्याचा सोयीस्कर घाट या सत्तेवर येणाऱ्या सरकारने घातलेला आहे. त्यामुळे तरुणपणीच युवकांच्या स्वप्नांचा चुराडा होताना पाहण्याची वेळ त्याच्यावर येणे यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते असणार आहे?


आज गावोगावी, खेडोपाडी मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगार दिसतात परंतु पैसे भरून कुठे नोकरीला लागावे म्हटले तर जेमतेम रोजचे जगणेच ज्याला कठीण जात आहे तो नोकरीसाठी पैसा कुठून आणणार? एखादा कुणी तालुक्याच्या पेट्रोल पंपावर काम करतो तर कुणी शैक्षणिक पात्रता असूनही एखाद्या शाळेत मिळेल त्या महिन्यावर काम करतो. या त्याच्या वाट्याला आलेल्या परिस्थितीला जबाबदार कोण असेल तर इथले शासन होय. काळानुसार शासनाने बेरोजगारी कमी करण्यासाठी योग्य त्या प्रमाणावर पावले उचलायला हवी. परंतु प्रत्यक्षात मात्र स्थिती 'आंधळं दळते आणि कुत्रं पीठ खाते...' अशी बिकट अवस्था तरूणांची झाली आहे. 'ना घर का ना घाट का' अशा पद्धतीने आजचा तरुण जगत आहे.




पूर्वी नोकऱ्यांमध्ये जाण्यासाठी तरूण मिळत नव्हते आणि आज कोणतीही नोकरी करण्यासाठी तरुण तयार आहेत तर त्याला नोकरी द्यायला कुणी तयार नाही. अशी बेभरवशाची जिंदगी झाली आहे. लग्नाचे वय झाले तरी नोकरी नसल्याने आपली मुलगी द्यायला बाप तयार नाही. अशा परिस्थितीत बिचाऱ्या मुलाने तरी काय करावे? तो द्विधा मनस्थितीत सापडला आहे. 'माय जेवण घालीना आणि बाप भिक मागू देईना' या प्रश्नात तो पुर्णपणे अडकला आहे. सारेच कसे दीप मंदावले.. आता अशी निराशामय परिस्थिती निर्माण झाली आहे. निषेध, मोर्चे, आंदोलने यासारखे शस्त्र हाती घेण्याशिवाय आता आजच्या तरुण पिढीपुढे दुसरा पर्याय शिल्लक राहिलेला दिसत नाही. भावनेचे दमन एकदा तो करू शकेल परंतु धन, पैसा याशिवाय तो जगू शकणार नाही. त्यामुळे काळाची पावले ओळखून त्याने आपली शस्त्रे आणि भूमिकाही बदलण्याची गरज आहे. कारण उद्यासाठी आपल्याला आज सामना करणे गरजेचे आहे.

कधी शासनाने पोलीस भरतीसाठी जागा काढल्या सर त्या पन्नास-शंभर जागेसाठी लाखोंनी बेरोजगारांचे अर्ज प्राप्त होतात. शिक्षणाची मर्यादा पदवीपर्यंत असली तरी मात्र एम. ए., नेट, सेट, पीएच. डी. इतकी उच्च पात्रता असणारी व्यक्ती मुलाखतीला येतात. काय करणार? दुसरा पर्याय नसतो. कसाबसा मुलाखत देतो आणि निराश होऊन घरी डोळ्यात अश्रू घेऊन येतो. किमान आता तरी शासनाने हे चित्र बदलायला हवे. ज्या तरुणाचे जितके शिक्षण झाले असेल त्याला त्याच्या शिक्षणानुसार जोपर्यंत कामधंदा मिळणार नाही तोपर्यंत बेरोजगारीचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी किमान आता तरी शासनाने व्यक्तिगत पातळीवर हेवेदावे विसरून तरुणांच्या वाढणाऱ्या बेरोजगारीवर लक्ष पुरविण्याची गरज आहे. आज स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना हे चित्र बदलले गेले नाही तर पुढील काळात याचे भयावह परिणाम नक्कीच दिसून येतील. म्हणून घातकेतच्या वळणावर उभा असलेला हा प्रश्न सोडविण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम लवकरात लवकर उभा करण्याची येत्या काळात गरज असणार आहे.

**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# देवघरातील निरांजने...

आधुनिक केसरी

कधी कधी दोघे मिळून एकाच ठिकाणी काम करतात आणि संसारही सांभाळतात. पण तरीही मुलांकडे विशेष लक्ष देते, घराकडे लक्ष देते ती सहधर्मचारिणी. सहधर्मचारिणी हा शब्द किती छान आहे ...! . बायको, पत्नी, सखी, मैत्रीण, प्रेयसी हे सगळे वेगवेगळे अर्थ आणि अर्थाचे वेगवेगळे पदर असणारे शब्द. पण लग्न झाल्यानंतर ज्या काही सगळ्या गोष्टी करायच्या, त्या सगळ्या गोष्टींचे धर्म हे अधिष्ठान असले पाहिजे. इथे धर्म हा शब्द रूढ अर्थाने मी वापरत नाही. धर्म म्हणजे आपल्या रोजच्या जीवनात ज्या काही गोष्टी आपण करू, जी काही जीवनपद्धती असेल त्याप्रमाणे वागू, रीतिरिवाज, संस्कार, नियम, परंपरा पाळू, त्या सगळ्या समाजमान्य असलेल्या गोष्टी. आणि या सगळी गोष्टीत जिची साथ असते ती सहधर्मचारिणी.

स्त्रीचा आपल्या घरासाठी, आपल्या मुलांसाठी त्यांचा त्याग मोठा असतो. आपल्या जोडीदाराच्या लहरी, त्याचे गुणदोष सांभाळून घ्यावे लागतात.. त्याशिवाय संसार यशस्वी होत नाही. यात स्त्रियांचे जसे योगदान असते, तसे पुरुष मंडळींचेही असते. असे ज्या घरात दोघे एकमेकांना सांभाळून घेतात, एकमेकांच्या आवडीनिवडी जपतात, ते घर हसते खेळते राहते. थोडीफार भांडणे, कुरबुर कुठे नसते! त्याशिवाय संसाराला मजाही नाही. जेवणामध्ये चटणी, लोणचे तोंडी लावायला हवेच असते. त्याशिवाय थोडीच चव येते !

स्त्रीची अनेक रूपे आहेत. आई, बहीण, पत्नी, प्रेयसी, सखी, मैत्रीण. ती कधी कोणाची काकू, कोणाची मावशी, कोणाची मामी तर कोणाची आत्या असते. प्रत्येकवेळी भूमिका वेगवेगळी. पण या सगळ्या भूमिका ती मोठ्या कौशल्याने पार पाडते. यासाठी तिच्यामध्ये असलेल्या प्रेम, क्षमा, धैर्य, प्रसंगावधान इ गुणांचा मोठा उपयोग होतो. त्यासाठी बऱ्याच वेळा तिला स्वतःच्या आवडीनिवडीना मुरड घालावी लागते. तिच्या सहनशीलतेची जीवन जणू परीक्षा पाहत असते. तिच्या त्यागावर घर उभे असते.

(क्रमशः)



# आनंदी पहाट

## बालहट्ट मोठेपणी तापदायक ठरतो

आधुनिक केसरी

लहान वयात मानसिक परिपक्वता कमी असते. अनेक बाबतीत समज, उमज देखील कमीच असते; अर्थात ही उणिव निश्चितच नाही, परंतू त्याकारणाने चांगले-वाईट, खरे-खोटे, आपले-परके, फायदा-तोटा अशा अनेक बाबींचे आकलन त्वरित होत नाही. अनेकदा वाईटच चांगले वाटत असते. म्हणजेच जे नकोय तेच हवे असते. लहान मुलांमध्ये असे चित्र दिसून येणे स्वाभाविकच असते. पण काही प्रमाणांत हे मोठ्यांच्या बाबतीत देखील जेव्हा दिसते तेव्हा मात्र बाल हट्ट केल्यासारखे वागणे ही त्यांच्यातील उणिव असते एवढे निश्चित. मोठ्यांच्या बाल हट्टाचा परिणाम देखील अनेक बाबतीत होतो, अनेकांना त्याचा मानसिक त्रासही होतो. ह्याची जाणीव वेळीच होणे जरुरीचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ह्या हट्टामध्ये समाविष्ट केली जाणारी अथवा अनावधानामुळे संबंधित आर्थिक बाब ही अनेकांची डोकेदुखी ठरते. अलीकडच्या काळांत साजरे केले जाणारे आप्तेष्टांचे, मित्रमंडळींचे वाढदिवस आणि त्यासाठी मुलांकडून होणारा हट्ट हा त्याचाच एक भाग म्हणता येईल. वाढदिवस पूर्वी देखील साजरे होत असत, परंतू त्याचे स्वरूप अतिशय निराळे होते. अनेकदा ते आपापल्यापरीने घरांतच साजरे होत असत. अलीकडच्या काळांतील वाढदिवस आदल्या दिवशी रात्री बारा वाजल्यापासूनच साजरे व्हायला लागतात. त्या उत्साहात आणि आनंदातिरेकाने इतरांना होणाऱ्या त्रासाचा का बरे विचार होऊ शकत नाही? ह्याची जाणीव घरच्यांकडून अशांना का करून दिली जात नाही? घरच्यांनाच त्याची जाणीव नसणे हीच उणिव म्हणावी लागेल.



आधुनिक केसरी

## सांगू नये कधी

सांगू नये कधी | दुःख अंतरीचे ||
भोग संचिताचे || खेळ सारे||१||

जाणतो सगुण | देव पाषाणाचा ||
भाव जो आत्म्याचा | एक व्हावा||२||

भेटला जयासी | सखा तो श्रीकृष्ण ||
होतोच अर्जुन | समाधानी|| ३||

मिळेना जोवरी | संगती सज्जन ||
दुर्दैवी तो जाण | नरजन्म||४||

मौनातच कळे | मर्म जीवनाचे ||
ऊन-सावलीचे | मृगजळ||५||

वाहतो चरणी | माझे हे 'मी''पण ||
तुजवीन कोण | मायबाप||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


**चिताभस्मालेपो गरलमशनं दिक्पटधरो**
**जटाधारी कण्ठे भुजगपतिहारी पशुपतिः।**
**कपाली भूतेशो भजति जगदीशैकपदवीं**
**भवानि त्वत्पाणिग्रहणपरिपाटीफलमिदम् ॥७॥**

हे भवानी, जे आपल्या अंगाला चिताभस्म विलेपित करून राहतात,विष हेच ज्यांचे भोजन आहे, जे दिगंबरधारी आहेत, ज्यांनी मस्तकावर जटा धारण केल्या आहेत, जे कंठात नागराज वासुकीला हार म्हणून घालतात, ज्यांच्या हातात भिक्षापात्र शोभून दिसते, असे भूतनाथ पशुपती सुद्धा जे एकमात्र जगदीश्वराची पदवी धारण करतात, त्याचे काय कारण आहे, हा महिमा त्यांना कसा प्राप्त झाला, तर तुझ्या समवेत त्यांचा विवाह झाला म्हणूनच हे महिमान त्यांना प्राप्त झाले. || ७ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## सृष्टीकथन

आधुनिक केसरी

नमस्कार मी कालच्या निरूपणात म्हणाले होते की काही समास तत्वज्ञान सांगणारे आहेत. पण आपल्या सारख्या सामान्य माणसाला तर समर्थाचे आदर्श विचार हवे आहेत ते आपल्या अंगी रूजायला हवे आहेत. पण त्यासाठी समर्थाच्या विचारांचा अभ्यास केला पाहिजे. तो आपण दासबोधाच्या रूपाने करतो आहोत.

विश्व निर्माण होण्याच्या आधीं ब्रम्ह असते. त्याठिकाणी विश्वाचा कोणत्याही प्रकारचा संदेह नसतो.

"मायाब्रम्ह निरूपणात"



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण या विषयावर अभ्यास केला आहे तो आता परत सांगत नाही.

*विश्व निर्माण होण्याच्या आधी ब्रम्ह असते ?

**"जीवभूतः सनातन : "म्हणजे या संसारात माझाच म्हणजे परमात्मस्वरूपाचा सनातन अंश जीव झाला आहे, असे गीतेचें वचन आहे. या गीतेच्या वचनावर आपण सगळे विश्वास ठेवतो गीतेच्या वचनावर जगण्याचा प्रयत्न करतो.पण"यद् द्रुष्टं तद् नष्ट्" म्हणजे जे दिसते तें नसतें. , या वचनाने जग खोटे ठरते. आता यामध्ये खरेखोटे पणा कोणी ठरवायचा? जग सत्य म्हणावे तर ते नाश पावते. म्हणून सत्य म्हणता येणार नाही.

बरं ते खोटे म्हणावे तर प्रत्यक्ष दिसते . म्हणून खोटे म्हणता येणार नाही.

आता ज्ञानी व अज्ञानी लोक काय म्हणतात ते बघा. जगामध्ये कितीतरी माणसे आहेत त्यांच्या मतामध्ये फरक पडतो म्हणून समाधान होत नाही. अज्ञानी म्हणतो की,हे विश्व शाश्वत आहे देवधर्म, तीर्थ,व्रत वैकल्ये हे सगळेच सत्य आहे. यावर ज्ञानी म्हणतो की"मूर्खस्य प्रतिमा पूजा"म्हणजे मूर्ख किंवा अज्ञानी आहेत त्यांच्यासाठी मूर्ती पूजा असते. या विश्वाचा प्रलय झाला तरी जे जसेच्या तसेच शिल्लक उरते ते ब्रम्ह. स्वानुभवाच्या या ज्ञानावर तो पैजा मारण्यासाठी तयार असतो. तेव्हा अज्ञानी विचारतो की "विश्व जर सगळं मिथ्या आहे तर मगं तू स्नान संध्या का करतोस..?गुरूभजन का करतोस?तीर्थयात्रा करत का फिरतोस?

# 'देवाला काळजी'

आधुनिक केसरी

'देवाला काळजी' असे आपण सहज बोलून जातो. परंतु आयुष्याच्या अनेक टप्प्यावर आपल्याला दिव्यत्त्वाची प्रचिती येते. फक्त आपण त्याकडे सजगतेने पाहत नाही. याबाबत एक दृष्टांत सांगतो. एके ठिकाणी, विष्णुसहस्रनामाचे पारायण सुरू होते. अनेक लोक नित्यपारायणाला येत आणि भंडाऱ्याचा प्रसाद घेऊन जात असत. असेच एके दिवशी, पारायण झाले आणि भंडाऱ्याला सुरुवात झाली. सगळे भाविक शिस्तबद्धपणे एका रांगेत उभे होते. सेवक प्रसाद वाढण्यासाठी उभे राहिले. तेवढ्यात एक फाटक्या वेषातील व्यक्ती, हातात भले मोठे पात्र घेऊन पुढे आली आणि प्रसाद मिळवण्यासाठी धडपड करू लागली. सेवकांनी तिला रांगेने ये सांगितले. परंतु, ती व्यक्ती अरेरावी करू लागली आणि चर्चेचे पर्यवसान वाद-विवादात झाले. सेवक त्या व्यक्तीला मठाधीपती यांच्याकडे घेऊन आले. स्वामींनी त्या व्यक्तीला अभय दिले आणि त्याच्या गैरवर्तणुकीबद्दल विचारणा केली. स्वामींना शरण येऊन ती व्यक्ती म्हणाली, 'स्वामीजी, माझ्या घरात सहा लहान-लहान मुले आहेत. ती उपाशी आहेत. त्यांना या प्रसादाची जास्त गरज आहे.'

'अरे, पण प्रसाद तर सर्वांनाच मिळणार होता ना?'- स्वामीजी उत्तरले.

'काय सांगावं? भली मोठी रांग संपेपर्यंत प्रसादही संपला असता तर? मी आणि माझी मुले उपाशी राहिलो असतो. म्हणून मी घुसखोरी केली. मला प्रसाद द्या स्वामी....'

स्वामींनी सेवकांना सांगून व्यक्तीसाठी प्रसाद बांधून दिला. प्रसाद सोपवताना स्वामीजी म्हणाले, 'तू इथे विष्णुसहस्रनाम म्हणायला येत होतास ना, थोडेसे मलाही म्हणून दाखवतोस?' तोंडघशी पडणार, या भीतीने त्या व्यक्तीने स्तोत्र म्हणायला सुरुवात केली.

ओम विश्वं विष्णुर्वषट्कारो भूतभव्यभवत्प्रभुः।
भूतकृद् भूतभृद् .....

एवढे म्हणून ती थांबली. कारण पुढचे स्तोत्र पाठ नव्हते. त्या श्लोकाच्या शेवटच्या शब्दाचा आधार घेत स्वामीजी म्हणाले, 'तुला १००० नावांपैकी फक्त ६ च नावे पाठ आहेत? त्या सहाव्या नावावर लक्ष केंद्रित कर. 'भूतभृद्' म्हणजे, अशी व्यक्ती, जी अखिल विश्वाचा सांभाळ करते, पोषण करते. तुला जर, हा अर्थ उमगला असता,



तर तू अशी कृती केली नसती आणि परमेश्वरावर भार टाकला असता. म्हणून प्रत्येक नामाचे महत्त्व समजून घे आणि संपूर्ण विष्णुसहस्रनाम आत्मियतेने पाठ करून दररोज भगवंताचे स्मरण कर. ती व्यक्ती खजिल होऊन प्रसाद घेत निघून गेली. स्वामीजींच्या सांगण्याप्रमाणे भक्तीभावाने विष्णुसहस्रनामाचे पठण करू लागली. मठात सामुहिक पठण आणि प्रसादाचे वाटप सुरू होते. मात्र, काही दिवसात एक अजबच घटना घडू लागली. भंडारा वाटून संपेपर्यंत भगवान कृष्णासमोर ठेवलेला नैवेद्य गायब होऊ लागला. सेवकांनी ही बाब स्वामीजींच्या कानावर घातली. स्वामींना अचानक त्या दीन व्यक्तीची आठवण झाली आणि विचारपूस केल्यावर, त्या व्यक्तीचे येणे बंद झाले, असे कळले. सेवकांना त्या व्यक्तीवर संशय आला. स्वामीजींनी त्या व्यक्तीची भेट घ्यायची, असे ठरवले. ती व्यक्ती नदीच्या पलीकडे असलेल्या गावात राहत होती. स्वामीजी येताच ती नम्रपणे उभी राहीली आणि नतमस्तक झाली. स्वामीजींनी तिची ख्यालीखुशाली विचारली आणि मठात न येण्याचे कारण विचारले. आपण घरीच स्तोत्रपठण करतो, असे ती म्हणाली. कुटुंबाच्या पालपोषणाचे काय? असे विचारले असता, ती व्यक्ती म्हणाली...'स्वामीजी! विष्णुसहस्रनामाचे पठण सुरू केल्यापासून एक तरुण रोज प्रसादपात्र घेऊन येतो आणि तो आपला सेवक आहे असे सांगतो. आपण एवढी कृपादृष्टी ठेवलीत, धन्य झालो.' यावर स्वामीजी म्हणाले, 'मी कोणीही सेवक पाठवला नाही. स्वयं परमात्मा तुमची क्षुधाशांती करण्यासाठी सेवकरूपाने तुझ्या द्वारी आला. हे तुझ्या श्रद्धेचे आणि भक्तीचे फळ आहे. भगवंतावर अशीच श्रद्धा कायम ठेव. कारण, तोच या जगाचा पालनकर्ता आहे.

# संत शंकरस्वामी महाराज वैराग्याचे महापुरुष : सारंगधर महाराज भोपळे

## श्री संत शंकरस्वामी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता; एक लाख भाविकांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**शिऊर :** श्री संत शंकरस्वामी महाराज वैराग्याचे महापुरुष होते स्वामी बद्दल निष्ठा ठेवल्यास श्रद्धेचे फळ निश्चित मिळते. अंतकरणाचा मनोरथ पूर्ण करण्यासाठी संतसेवा करा, संतसंगतीने जीवनाची कृतार्थता होते परिपूर्ण अवस्था प्राप्त होण्यासाठी संतांचे विचार आचरणात आणावे, असे प्रतिपादन श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थांनचे उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे यांनी केले. श्री संत शंकरस्वामी संस्थान फडाचा २७७ वा अखंड हरीनाम सप्ताह शिऊर येथे २ ते ९ ऑगस्ट दरम्यान संपन्न झाला, सप्ताहाच्या सांगतेवेळी झालेल्या काल्याच्या कीर्तनात ते बोलत होते. "तुझी संगती झाली माझी निश्चिती" या संत तुकाराम महाराज यांच्या रचनेवर त्यांनी विवेचन केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, श्री संत शंकर स्वामींचा अधिकार राज्यातील संत परंपरेमध्ये मोठा असून स्वामी चरण दर्शनामुळे मिळणारी ऊर्जा पावन करणारी आहे. मराठवाड्यातून सर्वात पहिले दिंडीची सुरुवात शंकरस्वामी महाराजांनी केली. आध्यात्मिक क्रांती घडवण्यासाठी तसेच सर्व समाजातील बांधव एकत्र येऊन संतविचाराचा प्रचार व प्रसारासाठी अखंड हरिनाम सप्ताह महत्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले प्रेम, विचार, आचार एकत्र आल्यास वारकरी संप्रदायात महापुरुष निर्माण होतो.

संत चमत्कार करत नसतात मात्र समाजाला योग्य दिशा देण्यासाठी त्यांना चमत्कार करावे लागतात असेही ते म्हणाले. वारकरी



परंपरेमध्ये जातीधर्माला थारा नसतो. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी संतांनी कार्य केले, असे भोपळे महाराजांनी किर्तनात सांगितले.

**तब्बल ६४ ट्रॅक्टर मधून महाप्रसाचे वितरण**

श्री संत शंकरस्वामी महाराज सप्ताहाच्या सांगतेवेळी तब्बल ६४ ट्रॅक्टरमधून महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. परिसरातील शेतकऱ्यांनी दोन दिवसापासून आपले ट्रॅक्टर सेवेत दिले होते.

**राष्ट्रगीताने कीर्तनाला सुरुवात**

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार राष्ट्रीय ध्वज उंचावत राष्ट्रगीत गायन केले.

**शिस्तीचे व एकोप्याचे दर्शन**

या अखंड हरीनाम सप्ताह कालावधीत शिऊर येथील स्वयंसेवक यांनी शिस्तीचे दर्शन घडविले तर ग्रामस्थांनी हेवेदावे बाजूला ठेऊन जातीयतेला मूठमाती देत एकोप्याचे दर्शन घडविले. सर्वधर्मसमभावाचे प्रतिक म्हणून यासप्ताहाने लौकिक मिळविला. सप्ताह यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी पुढाकार व परिश्रम घेतले.

**शाळा महाविद्यालयाचा सहभाग**

या अखंड हरिनाम सप्ताहाचे सांगते प्रसंगी महाप्रसाद वितरणासाठी शिऊर गावातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत महाप्रसादाचे वितरण केले. प्रा.कैलास जाधव यांनी विशेष योगदान दिले.

**किर्तन महाप्रसादावेळी पावसाची उघडीप**

अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात झाल्यापासून पावसाने दररोज हजेरी लावली होती. मात्र काल्याच्या किर्तन, व महाप्रसाद वितरण होईपर्यंत पावसाने उसंत घेतली.

**सप्ताहवेळी मान्यवरांची उपस्थिती**

कोरोनाच्या कालावधीनंतर व्यापक प्रमाणात सप्ताह पार पडला. या सांगतेप्रसंगी अंदाजे एक लाख भाविकांची उपस्थिती होती. सोळा एकर विस्तीर्ण परिसरात हा सोहळा पार पडला. सांगतेप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. सप्ताह यशस्वितेसाठी संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव यांच्यासह विश्वस्त, सप्ताह समितीचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# दि चिखली अर्बन को-ऑप बँकेचा जीवनगौरव पुरस्कार राधेश्यामजी चांडक यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सत्य कुटे**

**चिखली :** चिखली अर्बन बँकेचा जीवन गौरव पुरस्कार सहकारातील नामवंत व प्रतिष्ठित व सहकाराचे आधारस्तंभ समजले जाणारे बुलढाणा अर्बन सोसायटीचे संस्थापक चेअरमन राधेश्यामजी चांडक यांना जाहीर झाला आहे. बँक दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेला सहकार, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्म, क्रीडा, वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत आणि प्रतिष्ठित व्यक्तींना जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करत असते.

दि चिखली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. चिखली या संस्थेची ६१ वि वार्षिक सर्व साधारण सभा रविवार, दिनांक १४/०८/२०२२ रोजी सकाळी १० वाजता रानवारा रिसॉर्ट, हॉटेल रानवारा परिसर, जाफराबाद रोड येथे होणार आहे. चिखली अर्बन बँकेचा जीवन गौरव पुरस्कार बुलढाणा अर्बन सोसायटीचे संस्थापक चेअरमन राधेश्यामजी चांडक यांना दि चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांच्या हस्ते प्रदान करण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. राधेश्यामजी चांडक उर्फ भाईजी यांच्यामुळेच आज महाराष्ट्रात सहकारी संस्था ह्या गरुडझेप घेत आहेत. त्यांच्या अनुभवाचा उपयोग त्यांनी सहकारी संस्थांना व्हावा यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. साखर कारखानदारी, बँकिंग अश्या क्लिष्ट विषयांमध्ये अडचणी आल्यावर देखील मागे न हटता पुन्हा उभे राहिले. बदलता काळ आणि तंत्रज्ञान यानुसार आपण सुध्दा बदलायला पाहिजे हे आपल्या कार्यातून दाखवून



देऊन एक आदर्श प्रस्थापित केला. सहकाराला बळकटी देणाऱ्या महान कार्यकर्त्याला व सहकार निष्ठेला दि चिखली अर्बन को-ऑप बँक परिवारातर्फे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे. याशिवाय 10 वि मध्ये उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या गुणानुक्रमे 15 विध्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वितरित केले जाणार आहे. बँकेने कार्यक्रमस्थळी रक्तदान शिबिराचे देखील आयोजन केले आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून सर्वांनी रक्तदान करावे असे आवाहन दि चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांनी केले आहे.

तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधानांनी केलेल्या 'हर घर तिरंगा' या आवाहनाला प्रतिसाद देत महिला बचत गटाच्या महिला सभासद महिलांना यावेळी राष्ट्रध्वज वाटप केले जाणार आहे. या सर्वसाधारण सभेला आ. श्वेताताई महाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग संघचालक चित्तरंजन राठी यांची उपस्थिती यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या वैविध्यपूर्ण व भरगच्च कार्यक्रम असलेल्या बँकेच्या हिरक महोस्तवी वर्षातील सभेस बँकेचे सर्व सभासद, हितचिंकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांनी केले आहे.



# 'सारथी श्री गजानन' आणि 'हादसा' चित्रपटाचे पोस्टर रिलीज !

## शेगाव निवासी संतकवी श्री दास भार्गव महाराज यांच्या शुभहस्ते चित्रपटाच्या पोस्टरचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** शेगावच्या पावन भूमीवर शेगाव निवासी श्री संत गजानन महाराज आणि टाइम वर्ल्ड एंटरटेन्मेंट आणि गणेश रहिकवार फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित 'सारथी श्री गजानन' आणि 'हादसा' या आगामी चित्रपटाचे अनेक श्री संत गजानन 8 ऑगस्ट 2022 रोजी 'सारथी श्री गजानन' आणि 'हादसा' चित्रपटाच्या पोस्टर्सचे प्रकाशन महाराजांच्या गीत अभंगाचे निर्माते दिग्दर्शक संतकवी दास भार्गवजी आणि बाळासाहेब नवले यांच्या हस्ते दिनांक 8 ऑगस्ट 2022 त्यांच्या कलामाई इंग्लिश मीडियम स्कूलचे निवृत्त प्राचार्य, शेगाव कार्यक्रम संपला.

पोस्टर रिलीजपूर्वी चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक गणेश रहिकवार यांचा श्री दास भार्गव लिखित 'श्री गजानन महाराज, चरित्र कोश, 'अनुभव' आणि 'गावेशन' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रमानंतर दोन्ही चित्रपटांच्या पोस्टर्सचे विधीवत प्रकाशन करण्यात आले. चित्रपटाची कथा, संवाद, पटकथा, छायांकन, संकलन, निर्मिती आणि दिग्दर्शन गणेश रहिकवार हे सांभाळत आहेत तर चित्रपटातील प्रकाशयोजना आणि व्यवस्थापनाचे काम मास्टर साईल रहिकवार सांभाळत आहेत.

चित्रपटाचे गीत राजेश देवाळकर यांनी लिहिले असून संदीप कपूर यांनी संगीत दिले आहे. कार्यक्रमाचे व्यासपीठ निवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब नवले व शाळेच्या उपमुख्याध्यापिका माधुरी तिवारी यांनी केले. एस.आरती रहिकवार, मास्टर साईल रहिकवार, शाळेचे मुख्याध्यापक सूरज मिश्रा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शालेय विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती नोंदवली.

# बिडकीन येथे मोहरमनिमित्त सवारीची स्थापना व विसर्जन मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे दरसालबाद प्रमाणे मोहरम निमित्ताने नालसाब व बालम या सवारीची स्थापना दि.७ रोजी बिडकिन येथील टकार मधील आशुर खाणा येथे करण्यात आली. इ.स. सन काळापासून चालत असलेली ही परंपरा आजतागायत बिडकीन येथील अनेक वर्षापासून जुनी पिढी प्रमाणे सवारीची परंपरा ही आजपर्यंत कायम असून या सवारीची स्थापना मोहरम निमित्ताने करण्यात येत असते.

या सवाऱ्याची जुनी प्रथा बिडकीन मध्ये आतापावेतो कायम असून सर्व समाजातील भाविक भक्त दर्शनासाठी बिडकीन व परिसरातून येतात. या सवारीसमोर नवस बोलला जात असतो. आपले नवस या सवारी समोर करतात आपले नवस पुर्ण झाल्यावर आपले नालसाब व बालम या सवारी समोर न्याज



नजर करत, गोड भात, मलीदा शरबत, खिचडा शरबत ठेवुन व वाटप करुन हा नवस सवारी समोर फेडतात. मागील दि. ७ ते ९ पर्यंत विविध धार्मिक विधी पार पाडत असून आज दि.९ रोजी मोहरम निमित्ताने नालसाब व बालम या सवारींचे मिरवणूक टकार मोहल्ला ते चाऊस गल्ली ते बिडकिन येथील वेगवेगळ्या गल्लीमध्ये मिरवणूक काढण्यात येते व नियोजीत ठिकाणी शांत करुन विसर्जन केले जाते. बिडकिन पोलिस ठाण्याचे वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




# कन्नडमध्ये फटाके फोडून जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मंत्रिमंडळाच्या विस्तारात शिंदे गटातील संभाजीनगर जिल्ह्यातून अब्दुल सत्तार व संदिपान भुमरे यांची वर्णी लागल्याने माजी आमदार नितीन पाटील, उद्योजक मनोज पवार, अब्दुल जावेद यांच्या मार्गदर्शनाखाली कन्नड येथे फटाके फोडून जल्लोष करण्यात आला. यावेळी मनोज देशमुख, अमोल पवार, संतोष पवार, सोपान शिरसाट, सत्यम राठोड, सोमीनाथ दाभाडे, गजानन चव्हाण, आरिफ शेख, प्रथम जाधव, वाडिलाल पवार, भरत पाटील, अस्लम शहा इत्यादी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



## जुनं ते सोनं

आधुनिक केसरी

तब्बल ४० दिवसांनी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आज पार पडला. सुरुवातीलाच या विस्ताराला नाराजीचे ग्रहण लागल्याचे बोलले जात असून युवती मृत्यूला जबाबदार असल्याचा आरोप असलेले संजय राठोड यांचा समावेश केल्याने प्रदेश भाजप उपाध्यक्षा चित्रा वाघ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विरोधी पक्षात असताना वाघ यांनीच राठोड यांच्या विरोधात संघर्ष केला होता. आता शिंदे गटात असलेल्या राठोड यांचा पुन्हा समावेश करण्यात आला आहे. राठोड हे यापूर्वीही मंत्री होते, मात्र आरोपानंतर त्यांना पद सोडावे लागले होते. आता चित्रा वाघ यांच्या नाराजीची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेणार काय, हा प्रश्न आहे. याखेरीज अब्दुल सत्तार हेदेखील वादात सापडले होते. त्यांनाही स्थान देण्यात आले आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या टप्प्यात एकाही महिलेला संधी देण्यात आलेली नाही. विस्तार करताना शिंदे गट तसेच भाजपच्या प्रत्येकी ९ जणांना संधी देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात फार काही अनपेक्षित नावे नाहीत. मात्र शपथविधीत पहिले नाव राधाकृष्ण विखे यांचे होते. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील तसेच गिरीश महाजन या पक्षातील जुन्या नेत्यांऐवजी काँग्रेसमधून आलेल्या विखेंना सुरुवातीला शपथ देण्यात आली. अर्थात नगर जिल्ह्यात सहकार क्षेत्रात विखे यांचा असलेला दबदबा तसेच सर्वांशी असलेला स्नेह कामी आला. उत्तर महाराष्ट्रातील विजयकुमार गावित यांचीही निवड काहीशी अनपेक्षित आहे. भाजपने गावित यांच्याविरोधात आरोपांच्या फैरी झाडल्या होत्या. मात्र पुढे राष्ट्रवादी काँग्रेसमधून गावित हे भाजपमध्ये दाखल झाले. आदिवासी चेहरा या निकषावर गावित यांना संधी दिल्याचे मानले जात आहे. गावित यांच्या कन्या हिना या खासदार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात त्यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. मात्र त्यांना पदाने हुलकावणी दिली होती. राज्यात विस्तारात पहिल्या टप्प्यात एकाही महिलेला संधी मिळालेली दिसून आली नाही. भविष्यात होणाऱ्या विस्तारात ती संधी मिळेल, मात्र सध्या एकाही महिलेला स्थान मिळाले नसल्याने राज्य सरकारवर टीका होत आहे. भाजपकडे सलग दोन-तीन वेळा विजयी झालेल्या अनेक महिला आमदार आहेत. अशा वेळी त्यांना डावलणे योग्य नाही. याबाबत कितीही खुलासे झाले तरी ते समर्थनीय नाहीत. ज्येष्ठ नेते नाराज होऊ नयेत म्हणून महिलांना संधी द्यायची नाही हे धोरण वादग्रस्त ठरले आहेत. त्यामुळे विस्तारावेळीच चित्रा वाघ असोत वा इतर महिला आमदार त्यांची नाराजी राहणार हे निश्चित. विस्तारात तरुण आमदारांनाही फारशी संधी मिळालेली नाही. सावधगिरी बाळगत केलेला हा विस्तार आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील तसेच मुंबई अध्यक्ष मंगलप्रभात लोढा यांना संधी मिळाली आहे. या दोघांच्या जागी नवे चेहरे येतील. मुंबई पालिका निवडणूक तोंडावर आहे. सर्वासमावेशक चेहरा देऊन या निवडणुकीला सामोरे जाणे भाजपसाठी महत्त्वाचे आहे. पक्षाची माध्यमात सातत्याने बाजू लढवणारे आशिष शेलार, चंद्रशेखर बावनकुळे यांना स्थान मिळालेले नसल्याने आता प्रदेशाध्यक्षपदी दोघांपैकी एकाची निवड निश्चित आहे.



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

## सावित्रीमाते इथे पुन्हा जन्म घेऊ नकोस

आधुनिक केसरी

माते तू जो विचार करतेस ना!!! की, मी पुन्हा जन्म घेईन..... इथल्या मुलींना शिकवीन...... त्यांना मान सन्मानाने जगण्याचा विचार देईन....... इथली आर्थिक, सामाजिक, न्यायिक, शैक्षणिक, राजकीय विषमता नष्ट करेन...... शेतकऱ्याच्या शेतमालाला रास्त भाव देईन...... त्यांची आत्महत्या थांबविन.... हे इथ काहीही बदलणार नाही..... कारण तुझ्या सोबत चालणारा इथे एकही कार्यकर्ता उरला नाही.....ज्या यशवंताला तू सांभाळलं. लहानाचं मोठं केलं. डॉक्टर बनविलं. मृत्यू सोबत लढायचच असतं असा महान विचार दिला. तो यशवंत शेवटच्या क्षणापर्यंत लढला. असा यशवंत आता तुझ्या पाठीशी उभा रहायला कुणी तयार नाही. म्हणून म्हणतो माते तू पुन्हा जन्म घेऊ नकोस....



महात्मा ज्योतिबा फुले थोर मोठे समाजसुधारक होऊन गेले. त्यांना बदलणाऱ्या काळाची पाऊल ओळखता येत होती. त्यांनी स्वतः समाज व्यवस्था, धर्म व्यवस्था, जातीव्यवस्था, आर्थिक व्यवस्था, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी विषयावरती खूप मोठा गाढा अभ्यास केला होता. भारतीय संस्कृतीतील थोतांड चालीरीती बदलायला हव्यात. समाज व्यवस्था सुधारायला हवी. समाज शिकला पाहिजे. सत्य शोधता आलं पाहिजे. जातीभेदाच्या उतरंडी निखळून गेल्या पाहिजेत. शेतकऱ्यांचे हित साधलं पाहिजे. शेती मालाला रास्त भाव मिळाला पाहिजे. प्रत्येक जाती धर्मातील माणसांना माणूस म्हणून जगता आलं पाहिजे. विषमता नष्ट व्हायला पाहिजे. विशेषतः मुलींचे शिक्षण व्हायला हवे.म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीमाते तुझ्या हातातील झाडू फेकून दिला. आणि पाटी पेन्शिल हाती दिली. आणि सांगितलं, साऊ तू शिकली तर मुली शिकतील. त्या बोलायला लागतील. आत्मविश्वासाने वावरायला लागतील. अन्याय अत्याचाराला वाचा फोडतील. आणि समाजामध्ये माणूस म्हणून जगायला त्या सक्षम बनतील. जशा मुली शिकतील तसा समाज बदलेल.हे तुला पटलं आणि ते तू स्विकारलस. करूनही दाखवलस. तू स्वतः शिकलीस. संताच्या, पदस्पर्शाने पुनित झालेल्या महाराष्ट्रातील पुणे येथे भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून या देशातल्या धर्म व्यवस्थेनी नाकारलेल्या. बहिष्कृत केलेल्या.सर्व जाती धर्मातल्या शोषित महिलांना. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवलं. त्या धर्माच्या रितीरिवाजाचे साखळदंड तोडलेस.

यांनी मात्र बाई शिकली तर समाज बदलेल. समाज बदलला तर आपल्याला दलित आणि दलितेतरांचे शोषण करता येणार नाही. याचा इथल्या धर्म मार्तंडानी विचार केला. आणि तुला बदनाम करण्याचे षडयंत्र रचलं. म्हणून त्यांनी तुला विरोध करायला सुरुवात केली. बाई धर्म बुडवायला निघाली. म्हणून याच लोकांनी तुझ्या अंगावर शेण, माती, चिखल टाकले. ते एवढ्यावरच थांबले नाही. तर तुझ्या भोवताली गाणाऱ्या, नाचणाऱ्या, ध्येय विक्री करणाऱ्या बायांच्या निवासाची सोय बुधवार पेठेत केली. जेवढ छळता येईल तेवढा छळ तुझा केला. मात्र तू हरली नाहीस. काळाला मागे टाकत तू परिवर्तनाचे वादळ पुढे चालवत राहिलीस. चालता चालता जोतिबाची सावली, आधारवड म्हणून पाठीशी उभी राहिलीस. तू कितीतरी पात्रामध्ये आम्हाला रोज दिसलीस. आणि आजही दिसते आहे इतिहासाच्या पाणापाणावर.

विधवांचे बाळंतपण करणारी, अनाथांना सांभाळणारी, दलितांना पाण्याचा हौद खुला करणारी, बालविवाह प्रथा बंद करणारी, बालहत्या, भ्रूणहत्या थांबवणारी. विधवा परीत्यक्तांचा पुनर्विवाह करणारी, प्रेरणा देणारी. ज्योतिबा नंतर सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे घेऊन जाणारी. काव्य फुले बावनकशी, सुबोध रत्नाकर या नावाने काव्य लिहिणारी बाईला पती निधनानंतर सिकाळ धरण्याचा अधिकार नसतानाही, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मृत्यूनंतर पहिल्यादा हातात सीकाळ धरून ज्योतिबांना पाणी पाजणारी. पुरुषी अहंकारांना मूठ माती देऊन ज्योतिबांना भडाग्नी देणारी. आंतरजातीय विवाहास प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारी. प्लेगच्या साथीमध्ये मरण शिरावरून घेऊन लढणारी, अशी तू रोज नव्या नव्या पात्रात उभी होतीस. माते रोज नवा विचार घेऊन आमच्यासाठी लढलीस. हा सारा त्याग फक्त आणि फक्त आमच्यासाठीच केलास ना!!!!.

हे सारं दिसतंय, समजतंय तरी आम्ही माफी मागून जाहीर करतो. तुझ्या नावाने सुरू केलेल्या शाळेत तुझ्या ऐवजी सरस्वतीची पूजा आम्ही रोज करतो. ज्या भिडे वाड्यात तू पहिली मुलींची शाळा सुरू केली, त्या वाड्यात आम्ही दारू पितो, बियर रीचवितो, आणि बाटल्याही फोडतो. माफ कर माते.आजही मुलींना मान सन्मानीय जगता येत नाही.आम्ही डोक्यावरच ओझं कमी करण्यासाठी लहान वयातच बालविवाह करून मोकळे होतो. इथं मुलींचे लैंगिक, शारीरिक मानसिक शोषण होतं. दिवसाढवळ्या लोक बलात्कार करतात. तरी आम्ही आवाज उठवत नाही. कारण इथली राज्यसत्ता अशा लोकांची रखेल बनली आहे. इथली सरकारची व्यवस्था रक्षणाच्या ऐवजी भक्षक म्हणून काम करते आहे. कोण कुणाला कशासाठी शरण जाईल, हे काहीच सांगता येत नाही.

जगत वंदनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज, आणि हो!!! तुझ्याच विचारावर प्रभावित होऊन याच महाराष्ट्राच्या मायभूमीमध्ये जन्मलेले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी खूप चांगलं संविधान भारताला दिलय. त्याच महामानवांच्या विचाराची इथे रोज हत्या होते. माते तू जो विचार करतेस ना!!! की, मी पुन्हा जन्म घेईन..... इथल्या मुलींना शिकवीन...... त्यांना मान सन्मानाने जगण्याचा विचार देईन....... इथली आर्थिक, सामाजिक, न्यायिक, शैक्षणिक, राजकीय विषमता नष्ट करेन...... शेतकऱ्याच्या शेतमालाला रास्त भाव देईन...... त्यांची आत्महत्या थांबविन.... हे इथ काहीही बदलणार नाही..... कारण तुझ्या सोबत चालणारा इथे एकही कार्यकर्ता उरला नाही.....ज्या यशवंताला तू सांभाळलं. लहानाचं मोठं केलं. डॉक्टर बनविलं. मृत्यू सोबत लढायचच असतं असा महान विचार दिला. तो यशवंत शेवटच्या क्षणापर्यंत लढला. असा यशवंत आता तुझ्या पाठीशी उभा रहायला कुणी तयार नाही. म्हणून म्हणतो माते तू पुन्हा जन्म घेऊ नकोस....

माते तू पुनः जन्म घेऊ नकोस.!!!!!!!!



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

## आपल्या घरावर तिरंगा फडकवायला हवा

आधुनिक केसरी

शहिदांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत व्हाव्यात व नवीन पिढीला शहिदांची, क्रांतिकारकांची आठवण निरंतर रहावी व इतिहास जागृत रहावा याद्दष्टीकोणातुन अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 15 ऑगस्टला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवुन देशाची आन-बाण-शान उंचावण्यासाठी सर्वांनीच अग्रेसर रहायला हवे. कारण तिरंगा भारतासाठी व भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी अनमोल रत्न आहे. कारण यातूनच क्रांतीची मशाल उदयास आली व 15 ऑगस्ट 1947 हा दिवस उजाडला.

यात सुर्याचा प्रखर तेजोमय प्रकाश, चंद्राची शांतीमय प्रतीमा, लखलखत्या ताऱ्यांचे प्रकाशमय वातावरण निर्माण करणे आणि वायू देवतेच्या सहवासाने विराजमान होवून देशाच्या शुरवीरांना व क्रांतिकारकांना तिरंगा सांगतो की "मेरा देश महान" अमृतमहोत्सवी वर्ष पहाता महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी 15 ऑगस्टला एकाच दिवशी 75 लाख वृक्ष लावण्याचा निर्धार करावा. यामुळे अमृतमहोत्सवी वर्ष अनंत काळापर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहील व संपूर्ण भारतात आपल्याला हिरवागार गालिचा सर्वीकडेच दिसून येईल. 15 ऑगस्टला अमृतमहोत्सवाचे स्वागत करण्यासाठी आपल्याला संपूर्ण नद्यांचा खळखळाट ऐकू येईल, समुद्र देवता आपल्या लाटांच्या खुशीने स्वागत करेल अशा प्रकारे स्थल, जल, वायु देवता अमृतमहोत्सवी वर्षाचे स्वागतासाठी सज्ज आहे. देशातील वाढते प्रदुषण व दिवसेंदिवस कमी होत असलेले ऑक्सिजनचे प्रमाण यामुळे पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतु भयभीत आहे. याकरीता अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यांनी 15 ऑगस्टला एकाच दिवशी 75 लाख झाडे लावण्याचा संकल्प करावा. या वृक्षलागवडीमुळे देशातील वातावरण प्रफुल्लित होईल व आपले पुर्वज आशिर्वाद देतील आणि त्यांना अभिमान होईल की स्वतंत्र भारतात सर्वकाही ठीक आहे.वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळेल. आपल्या पुर्वजांनी अनेक कठीण प्रसंगांशी सामना करत 1947 ला देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. आज भारताला स्वतंत्र होऊन 75 वर्षे पूर्ण होत आहे त्यानिमित्त्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण भारतात जय्यत तयारी सुरू आहे. ही अत्यंत आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे. देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक थोर महात्मे, क्रांतिकारक, जहालवादी नेते, मवाळवादी नेते यांच्या एकसुत्री कार्यक्रमाने व बलीदानानेच 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेतो आहे. त्याकाळी स्वातंत्र्यासाठी घरा-घरातून आवाज बुलंद व्हायचा व स्वातंत्र्यासाठी संघर्षमय वातावरण निर्माण करून संपूर्ण युवावर्ग इंग्रजांशी लोहा घेण्यासाठी काहीही करायला तयार रहायचे. आज आपल्याला आपल्या क्रांतिकारकांचे, शहिदांचे, थोरमहात्म्यांचे अनुकरण करून त्यांनी मिळवुन दिलेल्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून आणि देश स्वतंत्र होऊन 75 वर्षे पूर्ण होत असल्याचे पाहून प्रत्येकांनी 15 ऑगस्टला आप आपल्या घरावर तिरंगा फडकवीलाच पाहिजे असा प्रण देशाच्या 135 कोटी जनतेनी घेतला पाहिजे. असे जर झाले तर



तिरंगा एवढ्या उंचावर गेलेला आपल्याला दिसेल की संपूर्ण जग आश्चर्य चकित होईल व म्हणतील खरोखरच भारत देश महान. कारण जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी अनेक धर्मांचे, पंथाचे,जातीचे लोक एकोप्याने रहातात. जेव्हा -देशाच्या एकतेचा आणि अखंडतेचा प्रश्न येतो तेंव्हा -तेव्हा एकनिष्ठेने कार्य करतात. त्यामुळे अमृतमहोत्सवी वर्ष काय असते ही बाब भारतातील 135 कोटी जनता आप आपल्या घरावर तिरंगा फडकवुन जगाला आपली ऐकता अवश्य दाखवेल. कारण भारतातील छोटे-मोठे सर्वच जाणतात की देश स्वतंत्र करण्यासाठी शुरविरांना, क्रांतिकारकांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या, बलिदान द्यावे लागले, फासावर जावे लागले तेव्हाच भारत स्वतंत्र झाला. आपण शुरविरांना, क्रांतिकारकांना, थोरमहात्म्यांना सुईच्या टोकायेवढीही मदत करू शकत नाही. परंतु 15 ऑगस्टला प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन आपल्या पूर्वजाच्या आठवणी ताज्या करू शकतो. आजही प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यात आपल्या पुर्वजांच्या आठवणी आहेत व स्वाभिमान आहे यात दुमत नाही. कारण जोपर्यंत सुर्य-चंद्र आहे तोपर्यंत भारत भूमितील प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्यवीरांना, शहिदांना, क्रांतिकारकांना आपल्या काळजात ठेवून स्मरणात ठेवील. आपले पुर्वज आपल्याला कुठुनतरी अवश्य पहात असेलच त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवून शहिदांना स्मरण केले पाहिजे व याच दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावून वाढत्या प्रदूषणावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज देशाची स्थल सेना, वायुसेना, नौसेना तिरंग्याचा स्वाभिमान अबाध्य रहावा यासाठी अहोरात्र देशाच्या सुरक्षेसाठी तत्पर दिसून येतात.त्यामुळे तिरंगा देशातील सिमावर्ती भागातील सैनिकांसाठी भारतमातेचा आत्मा आहे. जय हिंद!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राष्ट्रकुल स्पर्धा ती आणि ही !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**एकीकडे देशाला पदके मिळत असताना त्याचे श्रेय मोदीजीना जाते आहे असे म्हंटल्यावर काही नतद्रष्ट मंडळींना त्यातही उन्माद किंवा तत्सम भावना दिसत आहेत. काहींना राष्ट्रकुल स्पर्धा कमी महत्वाच्या वाटत आहेत. पण भ्रष्टाचाराच्या आठवणी पेक्षा पदकांची लयलूट ही देशाला अधिक प्रेरणा देत आहे. ही वेळ मान उंचावण्याची आहे . तिरंगा ध्वज वर जात असताना अभिमानाने उर भरून जाण्याची आहे आणि देशासाठी पदक मिळणाऱ्या खेळाडूंना गौरवण्याची आहे आणि त्यामुळेच त्या राष्ट्रकुल स्पर्धेतील काळ्या अध्यायला विसरून या राष्ट्रकुल स्पर्धेतील यशाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या क्रीडाक्षेत्रात होऊ घातलेल्या भरारीला शुभेच्छा देण्यासाठी सज्ज होऊ या !**

सध्या सर्वत्र राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे पडघम वाजत आहेत. वास्तविक ही स्पर्धा खरे तर कुठल्या प्रेरणेतून भरवली जाते आहे हे जाणून घेण्याची गरज आहे. देश पारतंत्र्यात होता तेव्हा इंग्रजांची राजवट जेथे जेथे होती अशा सर्व देशांतर्गत ही स्पर्धा सुरू झाली. कालांतराने देश स्वतंत्र होत गेले, पण स्पर्धा चालू राहिली. आशियाई आणि ऑलिम्पिक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने ही स्पर्धा महत्वाची आहे पण कधी तरी इंग्रजी साम्राज्याच्या खुणा ज्या नावात आणि हेतुत आहे ते बदलण्याची गरज निश्चित आहे. असो. पण या निमित्ताने भारतात भरवल्या गेलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेची आठवण झाल्याशिवाय राहत नाही ! तुम्ही म्हणाल भारतात भरवल्यामुळे पदकांची खूप रेलचेल होती म्हणून आठवण होते आहे का? तर या स्पर्धेची आठवण क्रीडाबाह्य गोष्टींच्या मुळे जास्त सर्वांच्या लक्षात राहिली आहे.

स्वातंत्र्या नंतर सर्वच क्षेत्रात प्रगती आणि स्वातंत्र्याच्या आंदोलनामुळे निर्माण झालेल्या देशभक्तीचे प्रतिबिंब उमटणे स्वाभाविक अपेक्षित होते पण दुर्दैवाने भ्रष्टाचार रुपी अजगर आमच्या सर्वच क्षेत्रांना गिळत गेला त्यात क्रीडा क्षेत्र कसे अपवाद असेल ? त्यामुळेच मिळेल तिथे, मिळेल तसे खाणे हा राजकीय नेत्यांच्या जीवन धर्माचा भाग बनला. सर्व क्रीडा संस्था राजकारण्यांनी ताब्यात घेतल्या आणि गल्ली ते दिल्ली क्रीडा क्षेत्रात पुढाऱ्यांचा सुळसुळाट झाला. त्या मुळेच भारतातील राष्ट्रकुल स्पर्धा पदक मिळवण्यापेक्षा भ्रष्टाचाराने जास्त गाजली. त्या आयोजनातील सुरस भ्रष्टाचाराच्या कथा अनेक दिवस गाजत होत्या. स्वतःला क्रीडा क्षेत्राचे अनभिषिक्त सम्राट समजणाऱ्या एका राजकारण्याने राष्ट्रकुल स्पर्धेच्या नियोजनात गिधाडासारखी झडप घालत, भ्रष्टाचाराची परिसीमा गाठली हा कटू पण सत्य इतिहास आहे. यात एक क्रीडा प्रकार अपवाद ठरला तो म्हणजे धनुर्धारी फेडरेशन. कारण त्याचे अध्यक्ष विजयकुमार मल्होत्रा नावाचे स्वयंसेवक होते !

व्यक्तिगत आकांक्षा केवळ पुरेशा नसतात तर आपण प्रतिनिधित्व करत असलेल्या आपल्या देशाबद्दलची आत्यंतिक अभिमानाची भावना ही खेळाडूच्या मनात विजगेषु वृत्ती निर्माण करत असते . दुर्दैवाने ही वृत्ती निर्माण करण्यासाठी आवश्यक वातावरण, सकारात्मकता निर्माण करण्यात आम्ही कमी पडलो. काही मंडळींना राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम हे शब्द कानावर पडले की




चवताळल्या सारखे व्हायचे त्यातून झालेला ऱ्हास सर्व क्षेत्र व्यापून होता.

मिल्खासिंग ही दंतकथा वाटावी किंवा ध्यानचंद नावाचा खेळाडू झाला की नाही असे वाटावे अशी स्थिती होती .ऑलिम्पिक ते राष्ट्रकुल आमची नजर एकमेव हॉकी च्या पदक मिळण्यावर असायची ! पी टी उषा पासून पुन्हा थोडी उभारी येऊ लागली. प्रकाश पदुकोण आणि सैद मोदी यांनी बॅडमिंटन मध्ये आशा जागवली पण या सगळ्यांचा क्रीडाक्षेत्रासाठी उपयोग घेण्यात आम्ही कमी पडलो. आमच्या सत्ताधाऱ्यांना खेळाडूंना पुरस्कार देणे, राज्यसभेत नियुक्त करणे इतकीच खेळाची कर्तव्ये बहुतेक माहीत असावीत अशी स्थिती होती.

एकेकाळी आशियाई स्पर्धेत हातातील बॅटम रिले स्पर्धेत खाली पडल्यामुळे आमच्या धावपटूंना स्पर्धेत पराभव पत्करावा लागला होता. हा इतिहास फार जुना नाही. एकूणच सांघिक भावनेचा अभाव सर्वच क्षेत्रात होता आणि क्रीडा क्षेत्रात त्याचा अधिक परिणाम पण होता. पण आज राष्ट्रकुल स्पर्धेत हॉकी, महिला क्रिकेट, टेबल टेनिस आणि बॅडमिंटन दुहेरी यात आम्ही यश मिळवत आहोत आणि वैयक्तिक पण नैपुण्यात चांगली वाटचाल करत आहोत.

२०१४ साली झालेल्या राजकीय परिवर्तनाने अनेक क्षेत्रे मोकळा श्वास घेऊ लागले त्यातील क्रीडा क्षेत्र एक महत्वाचे क्षेत्र ठरले आहे. कुठल्याही योजनांचे दोन भाग असतात एक दीर्घकालीन आणि दुसरे नजीकच्या नियोजनाचे ! केंद्र सरकारने सुरुवातीला २०१४ नंतर धर्मेंद्र प्रधान यांच्या नेतृत्वाखाली योजना बनवली आणि देशभर पुढील १० वर्षात आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्याच्या योजनेला वेग आला. ग्रामीण भागातील कौशल्य असलेले पण सुविधा नसल्याने, अनुभव आणि मार्गदर्शन याच्या अभावाने मागे पडणाऱ्या खेळाडूंना एक वेगळीच प्रेरणा या नवीन योजनेतून मिळाली. कविता राऊत, दत्तू भोकनळ आणि काल पदक मिळवलेला बीड जिल्ह्यातील अविनाश साबळे ही महाराष्ट्राला समजणारी उदाहरणे पण देशभर अशी अनेक खेळाडू उदयाला आली आहेत आणि त्यामुळे राष्ट्रकुल स्पर्धेत आमची कामगिरी दखल पात्र झाली आहे. पदके मिळणारे अनेक खेळाडू सामान्य स्थितीतून पुढे आली आहेत आणि ते पूर्वीच्या खेळाडूंकडून प्रेरणा घेत उद्याच्या खेळाडूंचे दीपस्तंभ बनत आहेत . ' आम्हाला नीरज चोप्रा कडून प्रेरणा मिळाली '! हे काही मैदानी खेळाडूंचे पदक मिळल्यावरचे मनोगत प्रातिनिधिक आहे . सामान्य स्थितीमधून देशासाठी असामान्य कामगिरी करणारे हे खेळाडू सर्वच क्षेत्राला प्रेरणा देणारे आहेत.

केवळ व्यवस्था आणि योजना आणि पैसा दिल्याने प्रेरणा निर्माण होत नसतात त्यासाठी सतत संवाद , कौतुक आणि संपर्क महत्वाचा असतो . माहीत नाही यापूर्वी देशाच्या किती पंतप्रधानांना , किती वेळ खेळाडूंशी बोलायला उपलब्ध असायचा ? पण आता पदक मिळाल्यावर दूरध्वनी करून आणि देशात परत आल्यावर प्रत्यक्ष सन्मानार्थ स्वागत कार्यक्रम आयोजन करून नरेंद्र मोदी जी यांनी खेळाडूं च्या मनात देशासाठी पदक मिळवण्याची जाजवल्य भावना निर्माण केली आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान , संशोधन , संरक्षण या सर्वच क्षेत्रात ' 'आत्मनिर्भर भारत' या मंत्राने नवसंजीवनी आणली आहे. क्रीडा क्षेत्रही त्याला अपवाद नाही . भारत आता ऑलिम्पिक स्पर्धा आयोजनात आपली उमेदवारी घोषित करू पाहत आहे . क्रीडा क्षेत्रातील पीछेहाट भरून काढून पुढे जाण्याचा पल्ला खूप मोठा आहे . किमान ३० वर्षे सातत्याने पुढील कुठल्याही सरकारला या दिशेने प्रयत्न करावे लागतील . पण ते करावेच लागेल . उद्याच्या आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेत कुठलेही क्षेत्र अपवाद करता येणार नाही ! त्यासाठी देश कटिबद्ध होत आहे , आमचा देश बदलतो आहे ह्याची साक्ष देणारे हे सगळे घडत आहे . देशाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात घडत आहे हे आणखी वैशिटय पूर्ण आहे .

एकीकडे देशाला पदके मिळत असताना त्याचे श्रेय मोदीजीना जाते आहे असे म्हंटल्यावर काही नतद्रष्ट मंडळींना त्यातही उन्माद किंवा तत्सम भावना दिसत आहेत. काहींना राष्ट्रकुल स्पर्धा कमी महत्वाच्या वाटत आहेत. पण भ्रष्टाचाराच्या आठवणी पेक्षा पदकांची लयलूट ही देशाला अधिक प्रेरणा देत आहे. ही वेळ मान उंचावण्याची आहे . तिरंगा ध्वज वर जात असताना अभिमानाने उर भरून जाण्याची आहे आणि देशासाठी पदक मिळणाऱ्या खेळाडूंना गौरवण्याची आहे आणि त्यामुळेच त्या राष्ट्रकुल स्पर्धेतील काळ्या अध्यायला विसरून या राष्ट्रकुल स्पर्धेतील यशाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या क्रीडाक्षेत्रात होऊ घातलेल्या भरारीला शुभेच्छा देण्यासाठी सज्ज होऊ या !

# बोलक्या चित्रांची कवितेतील अभिव्यक्ती



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**एखाद्या चित्राकडे पाहून कविता स्फुरते का ? अर्थात हो ! कारण मनात संवेदना, उत्स्फूर्तता आणि शब्दांची जाण असेल तर चित्रातून ही शब्द उमटतात. असा प्रयोग केला आहे कवी उदय भिडे यांनी. सहज एखाद्या चित्रकाराचे चित्र नजरेस पडले किंवा इतर माध्यमांवर चित्र आढळले तर मनाला भावलेले चित्र आणि त्यातील भाव व्यक्त करणारी कविता यांचा सुरेख संगम म्हणजे 'बोलकी चित्रे' हा काव्यसंग्रह! कवी उदय भिडे यांची ही बोलकी चित्राची संकल्पना खरेच मनभावन आहे. हा काव्यसंग्रह काव्यमय रंगांची उधळण करणारा आहे बरे का !**

संपूर्ण जीवसृष्टीमध्ये अनेक सजीव आजूबाजूला आढळून येतात. झाडे, झुडुपे, वेली सोबतच आकाश, धरणी हे सर्व जण आपआपल्या परीने व्यक्त होत असतात. व्यक्त होणं हा सजीव गुणधर्म आहे, स्थायी भाव आहे. तसाच माणूसही सहज व्यक्त होत असतो. इतर प्राणीमात्रांच्या तुलनेत मानवाला बुद्धी, भाषेची जाण आणि आकलनशक्ती प्राप्त असल्याने तो विविध माध्यमातून व्यक्त होत असतो. मनातील भावना रित्या करणं जीवनाचा एक अविभाज्य भाग असतो.

मानवी जीवन हे अनेक कलागुणांनी व्यापलेले असते. शब्द हे माध्यम आपण सगळेच व्यक्त होण्यासाठी वापरतो.कोणी लेखणीतून व्यक्त होतो, कोणी चित्रकलेतून तर कोणी शिल्पकलेतून! आपल्या मनातील, नजरेतील भाव त्या त्या माध्यमातून स्पष्ट उतरवणे, आपला मनोभाव सांगणे यासाठी ही विविध माध्यमे सहाय्यकारी ठरतात.

मनातील उत्कट भाव व्यक्त करण्यासाठी कविता हा साहित्यप्रकाराचा आधार घेतला जातो. कमीतकमी शब्दात अंतर्मनातील रुप, भावतरंग कवितेच्या ओळींमधून सहज पाझरतात. यमक, अलंकार आणि लयींनी सजलेली कविता मनाला मोहवते.


पाश्चात्त्य साहित्यशास्त्रकार एडगर अँलन पो म्हणतात ,"काव्य म्हणजे सौंदर्याची लयबद्ध निर्मिती' होय.

आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, प्रसंगाना शब्दरूप देऊन कवी समाजाचे प्रतिबिंब कवितेत निर्माण करतो. तसेच चित्रकार त्याच्या मनातल्या भावना, अनुभवाची व्याप्ती कुंचल्याद्वारे रेषा आणि रंगांच्या माध्यमातून त्यामागील भाव व्यक्त करतो. व्यक्त होण्याचे माध्यम जरी वेगळे असले तरी भावनांचा प्रकटीकरण आहेच !

एखाद्या चित्राकडे पाहून कविता स्फुरते का ? अर्थात हो ! कारण मनात संवेदना, उत्स्फूर्तता आणि शब्दांची जाण असेल तर चित्रातून ही शब्द उमटतात. असा प्रयोग केला आहे कवी उदय भिडे यांनी. सहज एखाद्या चित्रकाराचे चित्र नजरेस पडले किंवा इतर माध्यमांवर चित्र आढळले तर मनाला भावलेले चित्र आणि त्यातील भाव व्यक्त करणारी कविता यांचा सुरेख संगम म्हणजे 'बोलकी चित्रे' हा काव्यसंग्रह! कवी उदय भिडे यांची ही बोलकी चित्राची संकल्पना खरेच मनभावन आहे. हा काव्यसंग्रह काव्यमय रंगांची उधळण करणारा आहे बरे का ! चित्र आणि कविता अशी रचना या काव्यसंग्रहाची असल्याने उत्तमोत्तम चित्रं आणि सोबतच कवितांचा आस्वाद ही एकाच वेळी घेता येतो. कव्यसंग्रहाचे शीर्षक अगदी समर्पक आहे 'बोलकी चित्रे' ...चित्रेही आपल्याशी हितगुज करत असतात पण प्रत्येकाला ते समजेलच असे नाही. त्या चित्राचे अंतरंग वाचणारे संवेदनशील मन असावे लागते. आणि ती आकलनशक्ती कवी उदय भिडे यांच्यापाशी आहे त्यामुळे या चित्रातील बोलके भाव रसिकांपर्यंत त्यांनी या कव्यसंग्रहाद्वारे पोहोचवले.

पुस्तकाचे प्रत्येक पान उलटताना नजर चौफेर फिरत राहते कारण सुरेख आकृतीबंध, उत्कृष्ट रचना , आकर्षक रंगसंगती, दृष्टीला सुखावणारी चित्रे आणि बोलक्या कविता या गुणवैशिष्ट्यांमुळे पुस्तक सुरेख झाले आहे. आयुष्यातील रंगांचे महत्त्व आणि त्या रंगांची भूमिका अधोरेखित करणारा संग्रह आहे.

कविता आतून प्रकटली पाहिजे, त्याची प्रचिती आधी स्वतःला आली पाहिजे तरच ती इतरांपर्यंत पोहोचते. एखादे चित्रही कवीला लिहिण्याची स्फूर्ती देऊ शकते , हे या निमिताने उमगले.




'बोलकी चित्रे' या काव्यसंग्रहातील 'वरद- हस्त' ही कविता निसर्गाचं मानवी जीवनातील महत्त्व सांगणारी आहे.

'तोडिला शिरावरीचा, तो वरदहस्त होता
अपुलाच घात यात, मनुजास हे कळेना...'

आजकालची वाढती वृक्षतोड मानवी जीवनाला किती घातक आहे, झाडाला कवी वरदहस्त म्हणत आहे, आणि तो वरदहस्त कायम आपल्या डोक्यावर असायला हवा,याची जाणीव यातून करून देत आहेत.या चित्रकवितांमधून निसर्गाची विविधरंगी रूपे दिसतात , मनाला शांती प्रदान करतात.

'अरुप -दर्शनी लळा' ही कविता धरित्री,आकाश आणि नदीने ल्यायल्या रंगांचे वर्णन करणारे आहे. या संग्रहातील अनेक शब्द मनाला भुरळ पाडतात. हे शब्दसौंदर्य कवीने सुंदररित्या कवितेत उतरवले आहे. 'ढग्गुला' या कवितेतून बालमनात असलेली चंद्र, ढग यांची मैत्री बोबड्या शद्बातुन अवतरली आहे.या कवितेतील मूल चंद्राला उद्देशून म्हणतंय ,

"चांदुमामा लौकर ये
माझा ढग्गुला पाहून घे
शुंदल माझ्या ढग्गुल्याला
चांदन्यांच्या तिकल्या लावून दे ! "

मानवाने जीवनात अनेक सीमा आखल्या आहेत. स्वतःला एक ठराविक चौकटीत बंदिस्त केले आहे. पण निसर्गाने कधीच कोणत्याही बाबतीत भेद केला नाही ,त्याची समर्पण वृत्ती, देण्याची भावना सर्वांप्रति समानच असते, हे मानवाने आत्मसात करायला हवे , याची प्रचिती देणारी 'सीमोल्लंघन' ही कविता आहे.'किंवा ऐसे व्हावे' ही कविता अभंगाच्या रूपात प्रकटली आहे.

अनेक रंगछटा आणि काव्यप्रभा यामुळे कविता वाचताना कोणती वाचू आणि कोणती नको अशी अवस्था होऊन जाते. आताही कोणत्या कवितांविषयी लिह, असे मनाला होत होते म्हणून काही निवडक कवितांची ओळख करून दिली आहे. ह्या कविता वाचून हे चित्रकाव्य नक्कीच पूर्ण अनुभवायची उर्मी अंतर्मनात जागेल, याची खात्री आहे.

सृजनसंवाद प्रकाशनाने 'बोलकी चित्रे' काव्यसंग्रहाची निर्मिती अगदी उत्तमरित्या केलेली आहे. सृजनसंवाद नेहमीच नवनवीन संकल्पना घेऊन रसिकांसमोर येत असतात. हा चित्रकवितांचा रंगीबेरंगी आविष्कार रसिकांसमोर आणल्याबद्दल अभिनंदन. पुस्तकाची मांडणी, आतील सजावट आणि बोलकं मुखपृष्ठ मंदार नेने यांनी यथासांग आणि उत्कृष्ट पद्धतीने सजवले आहे. ज्येष्ठ कवी, गीतकार अरुण म्हात्रे यांनी काव्यसंग्रहांची उत्तम पाठराखण केली आहे. चित्रकला आणि साहित्य या माध्यमाना जोडणारा सांकव म्हणजे 'बोलकी चित्रे' हा कव्यसंग्रह होय. चित्रात रमणाऱ्या आणि कवितेत बहरणाऱ्या रसिकांनी हा काव्यसंग्रह नक्की आपल्या संग्रही ठेवावा !!

**(बोलकी चित्रे -काव्यसंग्रह / कवी उदय भिडे /प्रकाशक : सृजनसंवाद प्रकाशन)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मित्र



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**बाबासाहेब आंबेडकर यांनी आपला खरा मित्र म्हणजे ग्रंथ असल्याचे म्हटले आहे. ज्ञानाच्या कक्षा विस्तारत असताना सामाजिक विषमतेमुळे वाट्याला आलेले दाहक अनुभव, मानवाची उच्चनीचतेची परिभाषाची, जातीय समीकरण यावर आधारित उभ्या असलेल्या माणसांमधील सामाजिक भिंती, माणसाची जास्तीत जास्त आढळून येणारी स्वार्थी वृत्ती हे सर्व पाहता बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्जीव पण ज्ञानदात्या ग्रंथांना आपले मित्र मानले. मात्र असे असले. तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याला आपले जीवनध्येय मानून त्यांच्या चळवळीचा आणि जीवनाचा भाग झालेले काही जिवाभावाचे लोक बाबासाहेबांच्या सोबत होते.**

रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते मोलाचे म्हंटले जाते. मग सामाजिक परिवर्तन जाणिवेतून बाबासाहेबांच्या सोबत असणारे बाबासाहेबांचे अनुयायी किंवा मित्रच होते असे म्हणणे मला जास्त चांगले वाटते. दादासाहेब गायकवाड यांचे नातू यांनी सांगितलेला एक महत्वाचा प्रसंग म्हणजे दलितांची मंदिर प्रवेशासाठी होणारी अवहेलना पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचा निर्धार केला.

माणूस म्हणून जगताना दलितांसुद्धा मंदिरात प्रवेश मिळाला पाहिजे असा त्यांचा ह्या सत्याग्रहामागे उद्देश होता. पुढे त्यासंदर्भात जागोजागी बैठकी सुरू झाल्या. प्रवेश कसा करायचा, होणारा विरोध कसा असेल, कोण साथ देईल ह्याबाबत विचारविमर्श सुरू झाला. दलितांचा मंदिरप्रवेश म्हणजे अघटित घडणार धर्मविरुद्ध कार्य म्हणून प्रस्थापितांनी दंड थोपटले. त्यासंदर्भात दादासाहेब गायकवाड ह्यांनी मंदिराच्या पहाऱ्यासाठी भय्ये ठेवले जाणार अशी माहिती पत्राव्दारे बाबासाहेबाना दिली होती. दादासाहेब म्हणजे बाबासाहेबांची जणू सावली होते. बाबासाहेब ज्या ठिकाणी जात त्या ठिकाणी दादासाहेब हजर राहत असत. प्रत्यक्ष आंदोलनाचा दिवस उजेडला. एकेक करून कार्यकर्ते आणि दोन्ही बाजूचे लोक जमा झाले. पोलिस बंदोबस्त सुद्धा मोठ्या प्रमाणात होता. दलित मंदिरप्रवेश करीत असताना अचानक विरोधकांनी मंदिराच्या कानाकोपऱ्यातून दगडांचा वर्षाव सुरू झाला. त्यातील एक दगड बाबासाहेबांच्या डोक्याला लागला. बाबासाहेबांना दगड लागल्याचे दिसताच बाबासाहेबांच्या जवळच उभ्या असलेल्या दादासाहेबांनी बाबासाहेबांना घट्ट मिठी मारली व बाबासाहेबांवरचा दगडांचा वर्षाव स्वतःच्या पाठीवर झेलला. दगडांचा सतत वर्षाव सुरू होता, दादासाहेबांची पाठ रक्तबंबाळ झाली. पायाला मोठ्या प्रमाणात दगड लागून जखमा झाल्या. मात्र दादासाहेबांनी बाबासाहेबांची मिठी सोडली नाही. ह्याला निसिम्म भक्ती म्हणावे की जीवलग मित्राची मिठी हे सांगणे कठीणच आहे. बाबासाहेब आणि दादासाहेब म्हणजेच कृष्णाराव गायकवाड यांच्या नात्यांची वीण घट्ट होती. बाबासाहेब आंबेडकर यांना मिलिंद कॉलेजची स्थापना करायचे वेळी समाजातील अनेक व्यक्तींनी योगदान दिले. त्यातही दादासाहेब आघाडीवर होते अगदी मेनरोडवर असलेला आपला वाडा विकून बाबासाहेबांना ७५ हजार रुपयांची रक्कम त्यांनी त्या काळात कॉलेजच्या उभारणी साठी दिली.

बाबासाहेब जेव्हा जेव्हा नाशिकला येत, तेव्हा ते दादासाहेबांच्या घरीच थांबत. दादासाहेब त्यांना आवडतात म्हणून मासे खाऊ घालायचे. अगदी स्वयंपाकघरापर्यंत बाबासाहेबांचे संबंध होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेला गेले असताना दादासाहेबांनी मुखेडचा सत्याग्रह केला. आणि तो यशस्वी करून त्याचा इतिवृत्त पेपरमधील बातम्यांची कात्रणे त्यांनी बाबासाहेबांन पर्यंत पाठविली. चळवळीतील दोन महापुरुषांच्या मैत्रीचे एक दिलखुलास उदाहरण म्हणजे बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड ह्यांचा स्नेह होय. उच्चशिक्षणासाठी न्यूयॉर्क येथे बाबासाहेबांना लाला लजपतराय हया देशभक्त क्रांतिकारक नेत्यांसह नवल भथेना नावाच्या विद्यार्थ्यांशी मैत्री झाली. लिव्हिंग्स्टन हॉल येथे राहायला गेल्यावर नवल भथेना हा गुजराथ मधील पारसी धनाढ्य विदयार्थी त्यांच्यासोबत राहत होता. बाबासाहेबांची आर्थिकदृष्ट्या होणारी परवड आणि त्यांची जिद्द आणि ज्ञानासक्ती ह्यामुळे प्रभावित झालेल्या नवल भथेना ह्यांनी पुढे शेवटपर्यंत बाबासाहेबांना मित्र म्हणून साथ दिली व मित्र म्हणून मदतही केली. मूकनायक पाक्षिकाची चालवत असताना आर्थिक अडचणी वाढल्या प्रसंगी मूकनायक बंद करावे लागते की काय असे चिन्ह दिसत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवलग मित्र नवल भथेना यांनी मूकनायकाला मोलाचे आर्थिक सहकार्य केले होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नवल भथेना यांच्यामध्ये पत्रव्यवहार झाला. त्या पत्रव्यवहारात उद्योगपती गोदरेज ह्या कंपनीचा उल्लेख सापडतो. मूकनायक आपल्या सुरूवातीच्या अंकात गोदरेज कंपनीच्या तिजोरी, कपाट ह्यांच्या जाहीरात छापत असे. ह्या गोदरेजसारख्या नामांकित कंपनीची जाहीरात मूकनायक सारख्या दलित पाक्षिकाला मिळण्यामध्ये नवल भथेनांचाच मोठा वाटा होता. (संदर्भ परिवर्तनाचा वाटसरू डॉ. आंबेडकरांचे सहकारी नवल भथेना :प्रबोधन पोळ पा.न. ३४ अंक १६ ते ३० एप्रिल १९१८) नवल भथेनांनी मूकनायकांच्या आठ अंकात गोदरेजची जाहीरात मिळवून दिली.

अर्थतज्ज्ञ असलेल्या बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी जेंव्हा स्टॉक्स आणि शेअर्ससंबंधी लोकाना सल्ला देणारी कंपनी काढली. बाबासाहेबांचा अभ्यास इतका सखोल होता की त्यांच्या मार्गदर्शनामुळे लोकाना फायदा होऊ लागला अर्थातच ह्यामुळे बाबासाहेबांचीही चांगली कमाई होऊ लागली. मात्र त्याच्या जातीचा उल्लेख होऊन ह्या जातीयवादी देशात अर्थतज्ज्ञ असलेल्या बाबासाहेबांचा हा व्यवसाय बुडाला तेंव्हा पुन्हा एकदा नवल भथेना धावून आले आणि त्यांच्या ओळखीने बाबासाहेबांना एका धनिक पारशी गृहस्थाचा हिशेव व पत्रव्यवहार करण्याचे काम मिळाले. 1923 मध्ये लंडनहुन परत आल्यावर बाबासाहेब वकिलीचा अर्धवट सोडलेला अभ्यासक्रम कसा पुर्ण करता येईला याच्या विचार करत होते. नोकरी मिळने दुरापास्त वाटत होते. त्यांवेळी सुद्धा नवल भथेना यांनी बाबासाहेबांना दोन शिकविण्या मिळवुन दिल्या व आर्थिक हातभार लावण्यास मदत केली. पुढे वकिली सुरू करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून नोंदणी करणे आवश्यक होते, सनद आणण्यासाठी सुद्धा बाबासाहेबांच्या जवळ पैसे नव्हते अश्यावेळी 500 रुपये सनद मिळवून देण्यासाठी सुद्धा नवल भथेना यांनी मदत केली. आपल्या मुलाला आणि भाच्याला चांगला व्यवसाय सुरू करून देण्याबाबत सुद्धा बाबासाहेबांनी भनेथाला पत्र लिहिले आणि भनेथाने त्या दोघांना व्यवसाय सुरू करण्यात मदत केली मात्र तो व्यवसाय चालला नाही. 1920 मध्ये पुन्हा विदेशात जाण्याची गरज पडली तेव्हा बाबासाहेबांनी नवल भनेथा कडुन रु.5000 रु कर्ज घेतले होते. आजपासून जवळपास 100 वर्षापूर्वीचे 5000 म्हणजे किती मोठी रक्कम होती ह्याचा आपण विचार करू शकतो महत्वाचे म्हणजे बाबासाहेबांना खरेतर सामाजिक परिस्थिती आणि जातीयवाद ह्यामुळे विद्धता असूनही यश मिळत नाही, ह्यांची जाणीव असून, पैसा कसा परत मिळेल ह्याबाबत



निश्चित काहीही शाश्वतीचा विचार न करता नवल भनेथा ह्यांनी बाबासाहेबांना सातत्याने आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. बाबासाहेब एके ठिकाणी आपण अगदीच नाईलाज असल्याने पैश्याची मागणी करतो माझ्या मला तुझ्याशिवाय आर्थिक आधार नाही अस नवल भनेथा ला पत्रात लिहितात. पुढे एक नामवंत वकील म्हणून आणि भारतातील सर्वात लक्षणीय समाज सुधारक अशी प्रतिमा निर्माण होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खूप यशस्वी आणि अनन्यसाधारण व्यक्ती झाले मात्र त्यांनी आपला मित्र नवल भनेथा ह्यांची मैत्री कधीच विसरली नाही.

बाबासाहेबांना आर्थिक पाठबळ पुरवणाऱ्या मध्ये जिथे राजश्री शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड ह्यांचा मोठा वाटा आहे त्याचप्रमाणे नवल भनेथा हे सुद्धा अग्रक्रमाने येणारे एक नाव आहे असे असले तरी दुर्दैवाने बाबासाहेबांच्या मागे खंबीरपणे उभे असलेल्या ह्या मित्रा बद्दल जास्त माहिती उपलब्ध नाही आणि बाबासाहेबांच्या अभ्यासकांचेसुद्धा बाबासाहेबांच्या आणि नवल भनेथाच्या ह्या अनोख्या मैत्रीकडे दुर्लक्ष झालेले दिसते. स्वातंत्र्यसेनानी बाळ गंगाधर टिळक ह्याचें पुत्र श्रीधर टिळक ह्यांच्याशी असलेली बाबासाहेबांची मैत्री म्हणजे मैत्रीच्या नात्यात जातपात, धर्मभेद, उच्चनीच असा भेद तर नसतोच शिवाय मन जुळले की कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता निकोप मैत्री जपता येते ह्याचे आदर्श उदाहरण होय. देशाचे दुष्मन ह्या पुस्तकात जेधे जवळकर ह्यांनी बाळ गंगाधर टिळकांचा अपमान केला म्हणून कोर्टात केस दाखल केल्यावर जेधें आणि जवळकर ह्यांची बाजू वकील म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी मांडली होती ही बाब पूर्णपणे विसरून बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होत श्रीधर टिळक बाबासाहेबांचे मित्र झाले. तसेच श्रीधर टिळक हे प्रचंड ब्राम्हण्याभिमान असलेल्या नेत्यांचे चिरंजीव आहेत हे मनात न ठेवता बाबासाहेबांनी श्रीधररावानां मित्र म्हणून स्वीकारले ह्यात ह्या दोन्ही मित्रांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. श्रीधरपंत बळवंत टिळक बाबासाहेबांच्या चळवळीत समरस होऊ लागले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता त्यावेळी श्रीधर पंतांनी सत्याग्रहात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात 4 सप्टेंबर 1927 रोजी दलित आणि दलितेत्तर जातीतील सुधारणावादी तरूणांनी मिळून परिवर्तनाच्या दिशेने अग्रेसर होत समाज समता संघाची स्थापना केली. आणि बाबासाहेबांच्या पुढाकाराने आणि प्रेरणेने त्यावेळी समता नावाचे एक पाक्षिकही या परिवर्तनवादी तरुणांनी चालविले.

श्रीधर टिळक ह्यांनी समता समाज संघाच्या आंतरजातीय विवाह आणि सहभोजनाचे समर्थन तर केलेच होते. शिवाय 8 एप्रिल 1928 रोजी समता समाज संघाची पुण्याची शाखा श्रीधर पंतांनी स्वतःच्या वाड्यात सुरू केली होती आणि उदघाटना साठी स्वतः बाबासाहेब त्या ठिकाणी हजर राहिले. विरोधकांनी हा कार्यक्रम सुरू असताना वीज बंद केली असता गोड्या तेलाचे दिवे लावून मंडळींनी बाबासाहेबांच्या सोबत सहभोजनाचा कार्यक्रम केला. स्वतः श्रीधरराव पुणे शाखेच्या समता समाज शाखेचे उपाध्यक्ष झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता त्यावेळी श्रीधर पंतांनी सत्याग्रहात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. मुंबईला आल्यावर बहुतांश वेळी श्रीधरराव बाबासाहेबांना भेटल्याशिवाय जात नसत आणि बाबासाहेब पुण्यात आल्यावर त्यांनी आपल्या वाड्यात यावे म्हणून आग्रह धरत. 25 मे 1928 रोजी रेल्वेखाली आत्महत्या करण्यापूर्वी श्रीधरपंत ह्यांनी 3 चिठ्ठया लिहिल्या त्यातील एक चिट्ठी त्यांनी बाबासाहेबांना लिहिली होती ह्यावरून त्यांच्या मैत्रीतील निकोपता लक्षात घ्यावी लागते. कारण श्रीधर टिळक ह्यांना मृत्यूसमयी सुद्धा बाबसाहेबांची आठवण राहावी आणि ज्या बाबासाहेबांनी बाळ गंगाधर टिळक ह्यांच्या मृत्यूबद्दल अगदी छोटीशी बातमी देत दखल घेतली होती त्याच बाबासाहेबांनी श्रीधर टिळक ह्यांच्या मृत्यूने व्यथित होऊन दुनिया या साप्ताहिक मधे श्रीधरपंत विषयी भरभरून लिहिले की त्यात ते म्हणतात "टिळक घराण्यातील कोणाला लोकमान्य ही पदवी खरी शोभत असेल तर ते म्हणजे श्रीधरपंत टिळक".

बाबासाहेबांच्या बहुआयामी आणि अनन्यसाधारण व्यक्तिमत्वात त्यांनी जपलेले मैत्रीचे नाते खरं तर आपण त्यांच्या ग्रंथप्रेमामुळे पुस्तक हेच त्यांचे मित्र असे म्हणत दुर्लक्षित करतो असे मला वाटते. मात्र सोहनलाल शास्त्री, बी.सी. कांबळे, सी.के. बोले, वसंतराव गोडबोले, नीलकंठ सहस्त्रबुद्धे, पी.एन. राजभोज, पंजाबराव देशमुख, ते अगदी सदानंद फुलझेले, बी.डी. खोब्रागडे अश्या अनेक मंडळीसह शेवटच्या दिवसात त्यांच्यासोबत असलेले नानकचंद रत्तू अश्या अनेक सहकारी आणि अनुयायी कार्यकर्त्यांचे ते जीवाभावाचे मित्र होते ह्यात शंका नाही.

माणुसकी जागविणाऱ्या ह्या मानवतावादी मित्राला ह्या ठिकाणी बाबासाहेबांना मित्र म्हणताना सूर्याला मित्र का म्हणतात? ह्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्यासारखे वाटते... तर ह्या ज्ञानसूर्याला आणि मानवतेच्या मित्राला पुन्हा एकदा कोटी कोटी प्रणाम.

# प्रथा, परंपरा फक्त स्त्रियांसाठीच का ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**प्रथा, परंपरा चांगल्यासाठीच आहेत. पूर्वजांनी पाडलेल्या आहेत. त्या त्यांनी अगदी विचार करुनच पाडल्या असतील, त्याला वाईट म्हणू नये. परंतू त्या प्रथा परंपरा पाळण्यातून जर ती स्त्री संतुष्ट नसेल तर तिला त्या प्रथा परंपरा पाळण्याची बळजबरी का करावी? ती करु नये. कारण जी गोष्ट करण्यापासून किंचीतही फायदा होत नसेल तर ती गोष्ट करता कामा नये.**

आज आपण पाहतो की एक स्त्री वर्षभराचे व्रतवैकल्ये करते. ती उपवास करते. साऱ्या परंपरा, प्रथा पाळते. तरीही ती सुखी राहात नाही. सुखी वाटत नाही. पुर्वीही स्त्रिया ह्या अशाच प्रकारे व्रतवैकल्ये करायच्या. पतीसाठी लांब आयुष्याची प्रार्थना करायच्या. परंतु बदल्यात काय मिळायचं त्यांना क्लेश, दुःख, सतीप्रथा... खरंच जीवंतपणी त्यांना पतीच्या शरणावर जीवंत जाळलं जायचं आणि मोठ्या तोऱ्यानं सांगीतलं जायचं की ती अमूक व्यक्तीची आदर्श पत्नी. ती त्याचेसाठी सती गेली. महत्वपूर्ण गोष्ट ही की ती सती जात नव्हती स्वतः होवून. परंतु आमचा समाज स्वतः आदर्श नसला तरी स्वतःला आदर्श मानणारा हा समाज तिला पर्यायानं जगू देत नव्हता. तिला पदोपदी त्रास देत होता. तिला बंधनात बांधत होता.

तिच्या पतीच्या निधनानंतर लगेच तिची इच्छा असो वा नसो, तिचा साजश्रृंगार उतरवला जायचा. तिला पांढरी साडी दिली जायची. तिचं कुंकू पुसलं जायचं. पायातील जोडवे काढले जायचे. हातातील बांगड्या फोडल्या जायच्या आणि जर तिला पती शय्येवर सती जायचं असेल तर तिचं साजश्रृंगार उतरवलं जायचं नाही तर सोळा श्रृंगारांनी तिला नटवलं जायचं. चांगला भरजरी शालू परीधान करुन दिला जायचा. त्यातच नाकात मोत्यांची माळ आणि त्या पतीच्या शरणासोबत तिचीही मिरवणूक काढली जायची. त्यातच पतीच्या चितेसह तिचा अग्नीप्रवेश. या अग्नीप्रवेशाची आपण कल्पनाही करु शकत नाही की किती तिला परेशानी होत असेल जीवंत जळतांना. तिच्या वेदना ह्या तिलाच माहित असासच्या. त्यातच ती बाहेर येवू नये म्हणून काही काही ठिकाणी त्यांचे हातपायही बांधले जात पती शय्येवर टाकतांना. किती अघोरी प्रथा होती ती. त्यानंतर जी सती जात नसे. तिचा छळ केला जात असे. तिला राजसी सुख मिळत नव्हतं. तिला टोमणे मारले जात होते. समाज तिला बरोबर जगू देत नव्हता. काही काही घरी तर घराच्या चार भिंतीत तिला डांबून ठेवलं जायचं आणि परीवारातील लोक तिची इच्छा नसतानाही सामुहीक बलत्कार करायचे. हे असं वैधव्य असायचं. म्हणूनच स्त्रिया आपल्या पतीच्या लांब आयुष्यासाठी कामना करीत की पती हा जास्त दिवस जगायला हवा. कारण पती जर जीवंत असेल तर कोणी तिला विधवा म्हणणार नाही. कोणीही तिच्यावर लांच्छन लावणार नाही वा कोणीही घरातील व्यक्ती तिच्यावर बळजबरी करुन सामुहिकपणे बलत्कार करणार नाही.

आता तो काळ गेला. सतीप्रथा बंद झाली. लोकं आज सतीप्रथा पाळत नाहीत. परंतू प्रथा परंपरा आजही पाळतात. कारण पतीनं सुख द्यावं. परंतु आजचेही पती त्यांना खरंच सुख देतात का? तर याचं उत्तर नाही असंच आहे. आजचेही काही काही पती आपल्या पत्नीला जुवारामध्ये हारतात व तिचा दारुसाठी वा इतर शौकासाठी सौदा करतात. आजचेही काही काही पती मरण पावताच त्या स्त्रियांना विधवेचा पोशाख परीधान करायला भाग



पाडलं जातं. तिच ती पांढरी साडी, त्या बांगड्या फोडणे, ते जोडवे काढणे आणि कुंकू पुसणे आणि मग घरच्या मंडळींचे बलात्कार. खरंच या प्रथा परंपरा पाळण्याचा एवढा जर फायदा होत आहे. तर ज्या पतीच्या लांब आयुष्याच्या कामनेसाठी एवढ्या प्रमाणात त्या पाळल्या जातात, तो पती अल्पावधीत का मरावा किंवा पतीनिधनानंतर तिला विधवेचं जीवन का जगावं लागावं आणि महत्वाचं म्हणजे एवढी व्रतवैकल्ये पाळून सुद्धा पतीनं पत्नीला का घरातून हाकलून द्यावं? ह्याच प्रथा परंपरा पाळतात ना स्त्रिया साधारणपणे ज्या पतीसाठी. त्या पतीनं दारु, जुगार, गांज्याच्या आहारी जावे काय? त्यानं त्या स्त्रीला मारझोड करावी काय? वैगेरे प्रश्न अनुत्तरीतच आहेत.

महत्वाचं म्हणजे प्रथा, परंपरा चांगल्यासाठीच आहेत. पूर्वजांनी पाडलेल्या आहेत. त्या त्यांनी अगदी विचार करुनच पाडल्या असतील, त्याला वाईट म्हणू नये. परंतू त्या प्रथा परंपरा पाळण्यातून जर ती स्त्री संतुष्ट नसेल तर तिला त्या प्रथा परंपरा पाळण्याची बळजबरी का करावी? ती करु नये. कारण जी गोष्ट करण्यापासून किंचीतही फायदा होत नसेल तर ती गोष्ट करता कामा नये. त्याची बळजबरीही करता कामा नये. प्रथा परंपरेबाबत हेच आहे आणि मुख्य म्हणजे प्रथा परंपरा पाळायच्या पुरुषांसाठी. परंतु ज्या पुरुषांसाठी ती व्रतवैकल्ये करते, त्या पुरुषांनी एक पत्नी म्हणून स्विकारलेल्या स्त्रीला अचानक विवाहानंतरच्या जीवनात वितुष्ट आल्यास एकाएकी सोडू नये. त्याचा थोडा तरी विचार करावा आणि तिला हाकलूनच द्यायचं असेल तर त्या पाळण्यासाठी बळजबरी करु नये.

# लोकसंख्यावाढ आणि घटती संसाधन समस्या



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**लोकसंख्येत होणारी वाढ, कमी होणारी संसाधने आणि वाढती बेरोजगारी या गोष्टी नजीकच्या काळात देशातील अनेक समस्यांना जन्म देत आहेत. यामुळे विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कुटुंब नियोजन योजना, मोहिमा आणि स्वयंसेवी संस्थांची मजबूत भूमिका असूनही भारतातील लोकसंख्या वाढीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. स्पष्टपणे सांगायचे तर कुटुंब नियोजनासाठीच्या सरकारी मोहिमा पूर्णतः अपयशी ठरत आहेत.**

जगाच्या वाढत्या लोकसंख्येबाबत येणारे अहवाल मोठे धक्कादायक आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, 2050 पर्यंत आशिया खंडाची लोकसंख्या पाच अब्जांवर पोहोचेल आणि शतकाच्या अखेरीस जगाची लोकसंख्या 12 अब्जांवर पोहोचेल. महत्त्वाची आकडेवारी अशी आहे की 2023 पर्यंत चीन आणि भारताची लोकसंख्या समान असेल आणि 2024 मध्ये भारत चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल. परंतु वाढत्या लोकसंख्येबाबत काही दिलासादायक आकडेवारी आहेत, त्यानुसार गेल्या काही दशकांमध्ये लोकसंख्येच्या गतीमध्ये काहीशी मंदी आली आहे, विशेषतः 1971-81 दरम्यान वार्षिक वाढीचा दर 2.5 टक्के होता, तो 2011-16 मध्ये 1.3 टक्केवर आला आहे.

झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येचा परिणाम अन्न आणि औषधे, वाहतुकीचे साधने, वीज आणि घर यासारख्या आवश्यक गोष्टी आणि संसाधनांच्या उपलब्धतेवर होत आहे. याशिवाय पर्यावरण, भूक, बेरोजगारी आणि लोकांच्या आरोग्यावर होणारा परिणामही स्पष्टपणे दिसून येत आहे. लक्षणीय म्हणजे वाढती लोकसंख्या हे सर्वांना चांगले शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार, निवास आणि संतुलित आहार न मिळण्याचे मुख्य कारण मानले जात आहे. या व्यतिरिक्त, कुपोषण, दारिद्र्य आणि असंतुलित विकास देखील वाढत्या लोकसंख्येचे परिणाम आहेत.

केंद्र आणि राज्य सरकार स्वातंत्र्यापासून लोकांना चांगले आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि संतुलित आहार देण्याबद्दल बाता मारत आहेत, परंतु गेल्या साडे सात दशकांमध्ये देशाच्या निम्म्याहून अधिक लोकसंख्येला ना चांगले शिक्षण मिळाले आहे, ना चांगले आरोग्य. वाढत्या लोकसंख्येबद्दल काही मनोरंजक आकडेवारी राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणातून पुढे आली आहे. यानुसार संपत्ती आणि संपत्तीच्या आधारावर एकूण प्रजनन दर (टीएफआर) मध्ये तफावत दिसून येते. भारतात हा आकडा सर्वात गरीब गटात 3.2 मुले प्रति महिला, मध्यम गटात 2.5 मुले प्रति महिला आणि वरच्या गटात 1.5 मुले प्रति महिला असा आहे. यामुळे असे दिसून येते की लोकसंख्येची वाढ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये अधिक आहे. सध्या भारताच्या लोकसंख्येत तरुणांची लोकसंख्या पंचवीस कोटींपेक्षा जास्त आहे, म्हणजेच देशातील प्रत्येक पाचवी व्यक्ती तरुण आहे.

अशा परिस्थितीत एवढ्या मोठ्या लोकसंख्येला रोजगार, चांगले आरोग्य, संतुलित आहार, शिक्षण आणि घरे देणे हे भारतासारख्या विकसनशील देशासाठी मोठे आव्हान आहे. वास्तविक स्वातंत्र्यापासून लोकशाही देश असल्याने, लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी, भारताने चीन आणि इतर काही देशांनी अवलंबिलेल्या पद्धती आणि उपाय टाळले. इतर देशांनी त्यांच्या लोकसंख्येवर नियंत्रण मिळवले,मात्र आपल्याला त्यात यश मिळवता आले नाही.

प्रत्येकाला चांगले जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार आहे, परंतु जर चांगले जीवन जगण्यात अडथळा येत असेल तर त्या पैलूंचाही विचार होणे आवश्यक होते.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की लोकसंख्येची समस्या इतर सर्व समस्यांपेक्षा वेगळी आहे. ही वैयक्तिक बाब आहे. धर्म, जात, शेतीतील सुलभता आणि मजुरी किंवा इतर कारणांमुळे लोकसंख्या वाढवण्याचा विचार नव्याने समजून घ्यावा लागेल. एका सामाजिक सर्वेक्षणानुसार, कमी उत्पन्न गटामध्ये धर्म, जात किंवा कामाच्या सोयीसाठी जास्त मुले असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी शासकीय आणि अशासकीय स्तरावर प्रामाणिक उपक्रमांची गरज आहे. लोकांना सांगितले पाहिजे की मुले आणि कुटुंबाच्या हिताच्या दृष्टीने अधिक मुलांना जन्माला घालण्यापेक्षा कमी मुले जन्माला घालून त्यांना चांगले शिक्षण आणि चांगले आरोग्य देणे महत्त्वाचे आहे. जरी अलीकडे लोकसंख्या वाढीचा वेग मंदावला असला तरी दुसरीकडे जन्मदराच्या तुलनेत मृत्यूचे प्रमाण कमी



होत चालले आहे. 2001 ते 2010 दरम्यान 18.14 कोटींची लोकसंख्यावाढ नोंदवण्यात आली. गेल्या पाच वर्षांत सरासरी लोकसंख्या वाढीसाठी ही स्थिती आहे. ही वाढ मागील जनगणनेच्या आकडेवारीपेक्षा 17.64 टक्के अधिक आहे. आताही भारताची लोकसंख्या दरवर्षी 1.3 टक्के दराने वाढत आहे, जी चीनच्या तुलनेत अडीच पट अधिक आहे. तज्ज्ञांच्या मते, पाणी, जमीन, अन्नधान्य, कोळसा, पेट्रोलियम उत्पादने आणि इतर आवश्यक संसाधनांची सतत कमतरता आहे. सध्या पिण्याच्या पाण्याची आणि अगदी शुद्ध अन्नधान्याचीही मोठी समस्या आहे. भारतात डाळींच्या उपलब्धतेची समस्या कायम आहे. परिस्थिती अशा पातळीवर पोहोचली आहे की बाजारात पाणी, दूध आणि डाळींची उपलब्धता राखण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना कंत्राटे दिली जात आहेत.

याचा परिणाम असा की कोट्यवधींचे परकीय चलन भारताबाहेर जात आहे. आजही देशाच्या बहुतांश भागात विशेषतः ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पिण्यायोग्य पाणी उपलब्ध नाही. यामुळे गावांमधून सतत स्थलांतर होत आहे आणि शहरी लोकसंख्या सतत वाढत आहे. एका आकडेवारीनुसार जर गावांमधून शहरांकडे स्थलांतर थांबवले नाही तर 2030 पर्यंत शहरांची लोकसंख्या 40 टक्क्यांहून अधिक होईल. यामुळे लोकसंख्येचे ओझे घेणाऱ्या शहरांमध्ये नवीन समस्या निर्माण होतील. स्थलांतर आणि शहरी जीवनातील स्वरूपात झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे सामाजिक रचनेवरही विपरित परिणाम झाला आहे. गुन्हे वाढत आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या मते, वाढती गुन्हेगारी, रोगराई आणि समाजातील विघटनाच्या सर्व समस्या वाढत्या लोकसंख्येचा परिणाम आहेत. भारतातील वाढत्या लोकसंख्येची समस्या म्हणजे लोकसंख्येच्या स्थिरीकरणाचा अभाव. स्थिरीकरण म्हणजे एका वर्षात जन्माला आलेल्या लोकांची संख्या मरण पावलेल्या लोकांच्या संख्येइतकीच असावी. म्हणजेच जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यातील असंतुलन ही मोठी समस्या बनली आहे.

सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की 'छोटे कुटुंब-सुखी कुटुंब' याची समज खेड्यातील लोकांपेक्षा शहरातील लोकांना अधिक आली आहे. खेड्यांमध्ये शेती कामासाठी दोन -चार लोकांवर अवलंबून राहता येत नाही. मजुरी वाढल्यामुळे मजुरांकडून सर्व कामे करून घेणे म्हणजे तूट सोसणे आले. म्हणूनच एकत्रित कुटुंब आणि मोठ्या कुटुंबाची गरज आजही येथे कायम आहे. जोपर्यंत या समस्येचे योग्य निराकरण होत नाही, तोपर्यंत गावांमध्ये कुटुंब नियोजनाचे यश संशयास्पद आहे. सरकारने अशा काही योजना आणि पद्धती आखल्या पाहिजेत जेणेकरून मानवी श्रमशक्तीमुळे शेती आणि फळबागांवर परिणाम होणार नाही आणि कुटुंब नियोजन झाल्यावरदेखील लोकांना समस्यांना सामोरे जावे लागणार नाही.

# शब्दांच्या गाभाऱ्यात : गाव संस्कृतीच्या गंधाने संस्कारित झालेल्या कविता



भानुदास धोत्रे
संपर्क क्र. 7972625086

आधुनिक केसरी

**अलीकडील काळात मराठी काव्य प्रांतात मराठी कविता लिहिणारे अनेक कवी, कवयत्री उदयाला आलेले आहेत. त्यातही अत्यंत संवेदनशीलपणे लिहिणाऱ्यांचे प्रमाण हे नगण्यच असल्याचे जाणवते. जुन्नरस्थित पेशाने शिक्षिका असलेल्या श्रीमती सरिता म्हेत्रे-कलढोणे यांचा अलीकडेच "शब्दांच्या गाभाऱ्यात" हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून, त्यांच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब त्यात प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते. बालवयापासूनच मनावर झालेले सुसंस्कृतपणाचे संस्कार, अल्पवयातच जबाबदारीचं आलेलं भान, सूक्ष्म निरीक्षणदृष्टी यामुळे योग्य शब्दांची पकड घेत त्यांच्या कविता सहजपणे कागदावर उमटतांना दिसतात. त्यात कुठलीही ओढाताण झाल्याचे जाणवत नाही. शब्दांशी सहज खेळण्याची हातोटी त्यांना चांगल्या प्रकारे लाभली आहे.**

"शब्दांच्या गाभाऱ्यात" या त्यांच्या काव्यसंग्रहातील कविता वाचत असतांना त्यांच्या कवितांची वर्गवारी आपोआप वाचकांचे लक्ष वेधून घेते. एकूणच त्यांच्या संबंध कवितेकडे तटस्थपणे पाहत असतांना त्यांच्या काही कवितांची वर्गवारी पुढीलप्रमाणे मांडता येईल.

सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कविता -
हितगुज तुझं माझं, कुठे हरवला माणुसकीचा गाव, जाणीव, हरवलेली माणसे, दहावा रंग, संवाद, तत्त्वज्ञान, वंशाचा दिवा, पहाट, अवकाळी या सर्व कवितांमधून श्रीमती सरिता म्हेत्रे-कलढोणे यांनी सामाजिक आशय अत्यंत संवेदनशीलपणे शब्दबद्ध केला आहे. उदाहरणार्थ- भूकेला कुठे असतो जात अन् धर्म
ना माहित असते पोथ्या पुराणातील तत्त्वज्ञान
अन्नाचा कण मोठा धर्म वाटतो.

आशावाद व्यक्त करणाऱ्या कविता-
माणूसकीचा जपूया गंध, गुलदस्ता, रस्ता, पाऊल, नूतन, ध्यास तू इत्यादी कवितांमधून जीवनाकडे पाहण्याचा एक आशावादी दृष्टिकोन त्यांच्या कवितांमधून प्रतीत होतो. उदाहरणार्थ-
फुलासारखा जन्म असावा गंध सौख्य देणारा दुसऱ्यासाठी फुलता फुलता गुलदस्ता देवरूप होणारा

स्त्री विषयक जाणिवा प्रकट करणाऱ्या कविता -
अंगारा, मनात दाटलेले, वाट पाहती सारे, माहेराहून परततांना, माय, बंधन, कुणीतरी असावं, जाणून घे,ती, स्वाभिमान, कोंदण इत्यादी कवितांमधून श्रीमती सरिता म्हेत्रे-कलढोणे यांनी स्त्रियांची सुखदुःखे, शिक्षणामुळे स्त्रियांना आलेलं भान, आधुनिक स्त्रीची नोकरी आणि संसार सांभाळताना होणारी ओढाताण, ससेहोलपट उपरोक्त कवितांमधून मांडली आहे.

शेती मातीचे ऋण व्यक्त करणाऱ्या कविता -
सरिता ताईंचं बालपण गाव खेड्यात गेल्यामुळे ग्राम संस्कृतीची पाळंमुळं त्यांच्यामध्ये घट्टपणे रुजली आहेत. नोकरीच्या निमित्ताने त्या जरी शहरांमध्ये स्थायिक झालेल्या असल्या तरी गावाकडील मातीची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नाही. त्यांच्या पावलांची धूळ, नाळ मातीशी, मराठीमाती या कवितांमधून ते स्पष्टपणे प्रतीत होतं. उदाहरणार्थ-
माणिक मोत्याची रास भरली बाई शिगोशीग
सुगी चालली जोरदार कुणब्याची लगबग.

निसर्गपर कविता -
पाऊस मनातला, ऋतू हिरवा, काया, देणं, नार इत्यादी त्यांच्या कवितांमधून निसर्गाप्रतीची अपार श्रद्धा दिसून येते.

प्रेम सुलभ भावना व्यक्त करणाऱ्या कविता -
प्रेम हे तर सजीवांना लाभलेलं एक वरदान. प्रेमभावना ही मानवी नात्याला एकत्र गुंफून ठेवते बांधून ठेवते अशाच काही रचना सरितातांई यांनी उपरोक्त संग्रहात लिहिल्या आहेत त्या अशा- शोध, अबोल प्रेम माझे, भुरळ, गंध होता प्रीतीचा, प्रीत इत्यादी.

नातेसंबंध दर्शविणाऱ्या कविता-
बापलेक, मैत्री, मायबाप वृक्षवल्ली इत्यादी कवितांमधून सरिता ताईंनी मानवी नातेसंबंधांमधील अनुबंध हळुवारपणे उलगडून दाखविले आहेत.

थोर माहात्म्याप्रति कृतज्ञता -
क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. यामुळेच खऱ्या अर्थानं अनंत काळापासून कोनाड्यात खितपत पडलेली स्त्री शिक्षणाचे अमृत प्राशन करून पुढे आली आहे. म्हणून या थोर महात्म्याप्रतीची कृतज्ञता सरिता म्हेत्रे-कलढोणे यांनी सावित्री तू होतीस म्हणून, क्रांतीसुर्य ज्योतिबा आणि सावित्रीआई या कवितांमधून व्यक्त केली आहे.

विशेष उल्लेखनीय कविता -
कृष्णसखा, पसायदान चष्मा, सैनिक, होळी होऊ दे इत्यादी त्यांच्या काही विशेष उल्लेखनीय कविता ही नोंद घेण्यासारख्या आहेत. पसायदान या कवितेत त्या लिहितात-
विझत चाललेल्या अस्ताला काजव्यांचा नाजूक उजेड दे
अंधार भेदून जाणाऱ्याला लखलखता तेजाळता प्रकाश दे अवघ्या विश्वाला
मिळाया सुखसमाधान
माऊलीसारखं मलाही पसायदान दे

एकंदरीत सरिता म्हेत्रे-कलढोणे यांच्या सर्वच कविता मानवी मनाला भुरळ घालणाऱ्या असून यापुढेही त्यांच्या काव्य प्रवासाची पाऊलवाट अधिकाधिक प्रशस्त होत जाऊन हमरस्त्यात रूपांतरित होणार असल्याची ग्वाही त्यांच्या लिखाणामधून स्पष्टपणे जाणवते. आपल्या यापुढील लेखन प्रवासास भरभरून शुभेच्छा!!

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त • पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत • सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीश देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) पाने ५३४ MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच (सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परीक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त) पाने ५३४ MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज पाने ३६४ MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910



# शिक्षक संघटना समन्वय समितीचा भरपावसात निघाला मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जुनी पेन्शनसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक संघटना समन्वय समिती, औरंगाबादच्या वतीने सोमवारी (दि.८ ऑगस्ट) विराट मोर्चा काढण्यात आला. मोर्चात सहभागी सर्व शिक्षक बंधू भगिनींनी शिस्त काय असते हे दाखवून दिली. शिक्षणाधिकाऱ्यांकडून मोर्चेकऱ्यांत संभ्रम निर्माण करणारे आदेश जारी केले गेले तसेच मोर्चात सहभागी होणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला होता. मात्र हा इशारा धुडकावून शिक्षकांनी पावसातदेखील उत्साहाने विराट मोर्चा काढला.

यावेळी एकच मिशन जुनी पेन्शन, आम्हाला फक्त शिकवू द्या यांसह विविध घोषणा मोर्चात सहभागी शिक्षकांनी दिल्या. आमखास मैदानापासून विभागीय आयुक्तालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. नोव्हेंबर २००५ नंतर रुजू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, जवळपास 14 वर्षापासून प्रलंबित शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख याचबरोबर मुख्याध्यापक, विषय शिक्षक पदोन्नती देण्यात यावी, वस्तीशाळा शिक्षकांची मुळ नियुक्ती दिनांक ग्राह्य धरून सेवाज्येष्ठतेचा लाभ देण्यात यावा, सर्व शिक्षकांना कॅशलेस विमा योजना लागू करावी, अशा विविध 39 मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाचे नेतृत्व दिलीप ढाकणे, शेख अब्दुल रहीम (हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन), श्रीराम बोचरे, विजय साळकर, संतोष ताठे, विठ्ठल बदर आदींनी केले. या मोर्चात महिला शिक्षक भगिनीची संख्या भरपावसात लक्षवेधी ठरली. मोर्चात मोठ्या संख्येने शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होत्या.

# पैठण पं.स.मध्ये सामूहिक राष्ट्रगान कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य मोहीम" या उपक्रमा अंतर्गत पंचायत समिती पैठण येथे ९ ऑगस्ट "क्रांती दिन" निमित्ताने 750 विद्यार्थीनी व पंचायत समिती अंतर्गत अधिकारी कर्मचारी यांचा सामुहिक राष्ट्रगाण कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पैठण न्यायालयाचे न्यायाधीश सचीन भावसार दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, एस.आर. कनकदंडे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल, गटविकास अधिकारी डॉ. ओमप्रसाद रामावत, तहसीलदार दत्तात्रेय निलावाड, पैठण पोलिस निरीक्षक गोरख पवार, उप अभियंता बांधकाम संभाजी असोले, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी शिवाजी वणे, ज्योत्स्ना गहीरवाल, गटशिक्षणाधिकारी श्रीराम केदार हे उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते हर घर तिरंगा उपक्रमा अंतर्गत ग्रामपंचायतींनी तिरंगा ध्वजाचे वितरण करण्यात आले व तसेच हर घर तिरंगा उपक्रमाची प्रचार व प्रसिद्धी रथाला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी दशरथ खराद यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी पैठण येथील जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा, श्रीनाथ हायस्कूल, आब्दूल कादर उर्दू हायस्कूल, सनब्राईट इंग्लिश स्कूल, आर्य चाणक्य विद्यालय, शालिवाहन विद्यालय, हिंदू स्कॉलर विद्यालय येथील मुलींनी व मुख्याध्यापक, शिक्षक यांनी सहभाग नोंदवला.

सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी विस्तार अधिकारी शिक्षण श्रीराम केदार, केंद्र प्रमुख एस.बी. शिंदे, यु.ई. खरात, एस.बी. गोर्डे, गणपत मिटकर, विस्तार अधिकारी पंचायत अशोक घोडके, सी.एस. ढवळे, एस.एल. इंगळे, वरिष्ठ सहाय्यक सतीश आखेगांवकर, जी.जी. एंपलवार, कनिष्ठ सहाय्यक एस.आर. पवार, लहु तेलुरे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक जी.एम. निसर्गान, संदिप एडके, ग्रामविकास अधिकारी ईश्वर सोमवंशी, सागर डोईफोडे, आपले सरकार तालुका व्यवस्थापक निखिल खिस्ती, संगणक चालक हर्षद गोपीनारायण, अरुण डोंगरे, सहाय्यक प्रशासन अधिकारी एस.व्ही. चव्हाण, कनिष्ठ प्रशासन अधिकारी राजेश कांबळे, परीचर प्रविण शिंदे, सुनील चव्हाण, देविचंद भडके यांनी परिश्रम घेतले.



# संतोष अरसोड यांच्या 'शिक्षणाबिगर माणूस धोंडाच' प्रकरणाची अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** नामवंत पत्रकार व वक्ते संतोष अरसोड यांनी लिहिलेल्या 'प्रबोधन पंढरीचा क्रांतिकारी संत गाडगेबाबा' या पुस्तकातील एका प्रकरणाची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील बी.ए.भाग १ च्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. विद्यापीठाने बी.ए. भाग १ द्वितीय सत्राच्या आवश्यक मराठीच्या अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या 'शब्दगंध' या पाठ्यपुस्तकात संतोष अरसोड यांनी गाडगेबाबांवर लिहिलेल्या पुस्तकातील 'शिक्षणाबिगर माणूस धोंडाच' या प्रकरणाची निवड करण्यात आली आहे.

संतोष अरसोड यांचे 'प्रबोधन पंढरीचा क्रांतिकारी संत गाडगेबाबा' हे पुस्तक महाराष्ट्रभर गाजले आहे. या पुस्तकाच्या आतापर्यंत पाच आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. अरसोड यांचे नुकतेच 'सत्यशोधक गाडगेबाबा' हे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. मीडिया वॉच पब्लिकेशनने प्रकशित केलेल्या गाडगेबाबा विशेषांकाचे संपादनही त्यांनी केले आहे. त्या विशेषांकासाठी



जवळपास एक वर्षभर भटकंती करून शेंडगाव, दापुरा, ऋणमोचन, देहू, पंढरपूर, नाशिक, मुंबई, वलगाव या गाडगेबाबांच्या जन्मभूमी, कर्मभूमी व निर्वाणभूमीत जाऊन त्यांनी लाइव्ह रिपोर्टिंग केले आहेत. संतोष अरसोड यांनी 'लोकमत' वृत्तपत्रसमूहात उपसंपादक, प्रतिनिधी म्हणून काम पाहिले आहे. ते सध्या 'मीडिया वॉच' दिवाळी अंक, वेब पोर्टल व पब्लिकेशनचे कार्यकारी संपादक म्हणून काम पाहत आहे. ते अतिशय उत्तम वक्ते असून संत गाडगेबाबा, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर व्याख्यान देण्यासाठी त्यांना संपूर्ण महाराष्ट्रात आमंत्रित केले जाते. अरसोड यांच्या गाडगेबाबांरील लेखनाची बाबांचे नाव असलेल्या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# समाजाला एक नवी दिशा देण्याचे कार्य अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून घडले : भगवान कोकाटे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** अण्णाभाऊ साठे हे देशातील उपेक्षित लोकजीवनाच्या अनुभवाचे साठे ठरले. गोर-गरीब शेतकरी, शेतमजूर, श्रमिक, दलित, पददलितांचा व्यथा-वेदना कथा कादंबऱ्यांमधून प्रकर्षाने उमटाव्यात अशी त्यांची धारणा होती. अण्णाभाऊंचे साहित्य देशाबाहेर अगदी पोलंड, रशियातही लोकप्रिय झाले. अत्यंत अल्पशिक्षित असले तरी उपजत शाहिराला चिंतनाची जोड आणि वैश्विक कार्याची जोड असेल तर तो अजोड साहित्यिकही होऊ शकतो, हे अण्णाभाऊंनी दाखवून दिले. अण्णाभाऊंची लेखणी धारदार होती, असे प्रतिपादन भगवान कोकाटे बिरसा क्रांती ग्राम नांद्रा येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०२ वी जयंती निमित्त आज दि. ७ ऑगस्ट रोजी मानवहित लोकशाही पक्षाच्या वतीने लोणार तालुक्यातील ग्राम नांद्रा येथे अण्णाभाऊ साठे जयंतीच्या कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आदिवासी बिरसा क्रांतीदलचे जिल्हाध्यक्ष तथा सरपंच संघटनेचे अध्यक्ष भगवानराव कोकाटे होते तर प्रमुख उपस्थिती नांद्रा ग्राम पंचायत चे सरपंच एकनाथ उबाळे, माजी सरपंच उत्तम सानप, कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानव हित



लोकशाही पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन अंभोरे यांनी केले. जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले होते.

या पुढे बोलताना कोकाटे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे हे शाळेमध्ये दीड दिवस गेले व शिक्षकांनी मारल्यामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यानंतर कामासाठी वन वन भटकत गेले. मुंबईसारख्या ठिकाणी कारखान्यामध्ये काम करू लागल्यानंतर शिक्षणाचा ध्यास सोडला नाही. त्यांनी अनेक अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकीर आहे कादंबरी नाव रुपास आल्यामुळे नवीन तरुण पिढीनेत्यांचा आदर्श ठेवून शिक्षणाची कास धरावी व त्यांचे गुण अंगी करावे लागेलस असे करण्यात आले.

यावेळी ॲड. शिवशंकर आघाव, सरपंच उबाळे, माजी सरपंच उत्तमराव सानप, रमेश मुंडे, बळीराम दराडे, कांबळे, शंकर सोनवणे, अंबादास वाणी, केशव नरवाडे, विजू सोनुने, गजू सोनुने तसेच या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला व पुरुष व गावकरी उपस्थित होते.



गंगापूर : श्री शिवाजी विद्यालय रांजणगाव (शे.पुं.) येथे 75 वा आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत क्रांती दिनानिमित्त सामूहिक राष्ट्रगीत घेण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अनिलकुमार घारुळे हे उपस्थित होते. शाळेतील सर्व कर्मचारी व तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल भांडे यांनी केले.

# क्रांती दिनानिमित्त छत्रपती विद्यालयात सामूहिक राष्ट्रगान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त क्रांती दिनाच्या औचित्य साधून दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी प्रभात फेरी काढून छत्रपती प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांमध्ये सामूहिक राष्ट्रगीत घेऊन शहिदांना मानवंदना देण्यात आली. यावेळी शाळेत नृत्य, नाट्य आणि लेझीम सादरीकरण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रशालेतील सहशिक्षक रामदास वाघमारे यांनी लेझीमच्या माध्यमातून विविध फार्मूले सादर करुन शहिदांना मानवंदना दिली. प्रशालेतील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष पाटील यांनी विद्यार्थ्यांना भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या शहीद वीराविषयी माहिती सांगितली. प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र चव्हाण, संस्थेच्या पदाधिकारी सोनाली पाटील, प्रशालेतील सहशिक्षक रामदास



वाघमारे, जितेंद्र शिंदे, अनिता कांबळे, नंदा देशमुख, उत्तम जाधव यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश आंधळे यांनी केले तर आभार अण्णा आंधळे यांनी मानले.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# पदाधिकाऱ्यांचे शासनाच्या आडमुठे धोरणाविरुद्ध आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** खोट्या नाट्या तक्रारी करून शासनाची दिशाभूल करुन गावाचा विकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या सर्व प्रकरणात शासनाने अशा व्यक्तींना पाठबळ देत आहे. शासनाच्या आडमुठे धोरणाच्या विरोधात वासडी (ता. कन्नड) येथील सरपंच राहूल पाटणी, उपसरपंच व ग्राम पंचायत सदस्य व ग्रामस्थ सोमवार (दि.८) पासून कन्नड पंचायत समिती समोर आमरण उपोषणाला बसले आहे. वासडी येथील जनसुविधा योजनेमधून मंजूर असलेली ग्राम पंचायत इमारत बांधकामास मंजुरी तात्काळ मिळावी, मुख्यमंत्री पेयजल योजना मंजूर असलेल्या व पाच वर्षात झालेले टेंडरचे काम तात्काळ पुर्ण करुन देणे, शौचालय बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांस प्रोत्साहन पर बक्षिस अनुदान त्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावे, वंचित असलेले पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेमध्ये नावे समाविष्ट करून लाभ मिळवून दयावा, रमाई योजनेमधून वंचित असलेले पात्र लाभार्थ्यांची नावे घरकुल योजनेत समाविष्ट करुन लाभ मिळवून द्यावा, दिव्यांग व्यक्तींना पात्र लाभार्थ्यांना विना अट घरकुल योजनेमध्ये नावे समाविष्ट करुन लाभ मिळवून द्यावा, ग्राम पंचायतने दिलेले प्रस्ताव सिंचन विहिर, गायगोठे फळबाग योजनेत पात्र लाभार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्तावास मंजूरी द्यावी व जलसिंचन योजनेमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी यासह इतर मागण्यांचा सविनय पुर्वक विचार व्हावा.

सदरील कामे मार्गी लावावीत यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी वासडीचे सरपंच राहूलकुमार पाटणी, उपसरपंच किसन आव्हाड, ग्रामपंचायत सदस्य रंजनाबई घुगे, रूखमनबाई नरवडे, बन्सीधर निकम, नामदेवराव सोनवणे, किसनराव घुगे, महावीर पाटणी, निसार शेख, सचिन पाटणी, भागीनाथ सोनवणे, खंडू मुगले, सलीम शहा, ज्ञानेश्वर नरवडे आदीसह लाभार्थी कन्नड पंचायत समिती कार्यालय, प्रांगणात आमरण उपोषणास बसले आहे. जोपर्यंत संपूर्ण मागण्या मंजूर होत नाही किंवा मार्गी लागत नाही, तोपर्यंत अहिंसक मार्गाने विना अन्न, पाणी आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.






संभाजीनगर शिवसेनेचे नवनिर्वाचित महानगप्रमुख किशनचंद तनवानी यांनी पूर्वचे शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. यावेळी पूर्व विधानसभा संघटक तथा मा. स्थायी समिती सभापती रेणुकादास वैद्य यांनी तनवानी यांना महानगरप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, पूर्वचे शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी, फुलंब्री मतदारसंघांचे शहरप्रमुख ज्ञानेश्वरी डांगे, उपशहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, उपशहरप्रमुख कृष्णा मेटे, मा. नगरसेवक मकरंद कुलकर्णी, अनिल जैस्वाल, शिवाजी लुंगारे, राजू खरे तसेच पूर्व विभागातील सर्व पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पदवीच्या निकालात शेकडो विद्यार्थ्यांना ‘भोपळा’ ग्रेड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एकीकडे राज्यात टीईटी घोटाळ्याचे प्रकरण गाजत असतांना दुसरीकडे आता औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या निकालावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहेत. दुसऱ्या सत्राच्या निकालात अनेक विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयात चक्क शून्य ग्रेड मिळाले आहेत. विशेष म्हणजे याच विद्यार्थ्यांना पहिल्या सत्रात त्याच विषयात 'ए ग्रेड' मिळाले असतांना आश्चर्य व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी परीक्षांच्या निकालात गोंधळ झाला असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. विद्यापीठाच्या बीए., बीकॉम, बीएससीच्या दुसऱ्या सत्राचा निकाल जाहीर करण्यात आला असून यावेळी अनेक विद्यार्थ्यांचे ग्रेड शून्य दाखवण्यात आले. काहींना एका विषयात तर काहींना चार-चार विषयात शून्य ग्रेड दाखवण्यात आले आहे. विशेष म्हणजे याच विद्यार्थ्यांना त्याच विषयात पहिल्या सत्रात ए ग्रेड मिळाले आहे. त्यामुळे मुलांना शून्य मार्क देण्यात आल्याने आमच्या मुलांनी पेपर लिहिलाच नाही का? असा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे. जालना जिल्ह्यातील बी.कॉमच्या दुसऱ्या वर्षात असलेल्या एका विद्यार्थ्याला सर्व विषयात ए प्लस आणि ए ग्रेड मिळाले आहे. मात्र एकट्या इंग्रजी विषयात त्याला शून्य ग्रेड दाखवण्यात आले आहे. अशाच दुसऱ्या एका विद्यार्थ्याला बी.कॉमच्या दुसऱ्या वर्षात सर्व विषयात ए प्लस आणि ए ग्रेड मिळाले असून, व्यवसाय गणित आणि सांख्यिकी या विषयात शून्य ग्रेड दाखवण्यात आले आहे. अशा पद्धतीने मराठवाड्यातील शेकडो विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर वेगवेगळ्या विषयात शून्य ग्रेड दाखवण्यात आल्याने पालकांमध्ये खळबळ उडाली आहे. त्यामुळे याची तात्काळ दखल घेऊन विद्यापीठाने खुलासा करावा अशी मागणी केली पालकांनी केली आहे.

यावर बोलतांना मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रमोद येवले म्हणाले की, यात आक्षेपाचा प्रश्न नसतो. त्या निकालात बदल होऊ शकतो. पाच-दहा टक्के निकालच असं होऊ शकते. त्यामुळे ज्यांना शून्य ग्रेड मिळाली आहे, त्यांनी परीक्षा भवनला जाऊन भेटावे त्यात सुधारणा करून दिले जाईल, असे कुलगुरू म्हणाले आहे. ज्यांच्या गुणपत्रिकांवर चुका झाल्या आहेत, त्यांनी विद्यापीठातील परीक्षा भवनात अर्ज करून दुरूस्ती करून घेण्याचे आवाहन कुलगुरू यांनी केले आहे. मात्र इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना विद्यापीठात परीक्षा भवनला येणे शक्य नाही. तसेच विद्यापीठाच्या चुकीसाठी विद्यार्थ्यांना प्रवासाचा भुर्दंड का? असाही प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे प्रत्येक महविद्यालयाकडून विद्यापीठाने अशा शून्य ग्रेड मिळालेल्या विद्यार्थ्यांची माहिती मागवून घ्यावी. तसेच विद्यापीठाने त्यांच्या पातळीवर दुरुस्ती करून नवीन गुणपत्रिका संबधित महाविद्यालयात पाठवावेत अशी मागणी पालकांनी केली.

# प्रधानमंत्री घरकुलांचे रखडलेले अनुदान मिळावे

## रिपब्लिकन च्या विजयकांत गवई यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** दि.8 रोजी रिपब्लिकन सेनेच्या वतीने मुख्याधिकारी यांना चिखली शहरातील प्रधानमंत्री घरकुल योजनेचे रखडलेल्या अनुदान त्वरित देण्यात यावे असे निवेदन देण्यात आले. कित्येक वर्ष झाले प्रधानमंत्री घरकुल योजनेचे अनुदान आतापर्यंत नगरपालिका यांच्याकडे केंद्र सरकारने घरकुल योजनेचे राहिलेले अनुदान दिले नाही. घरकुल लाभार्थी नगरपालिकेमध्ये चकरा मारत असून त्यांना नगरपालिका कर्मचारी अजून निधी आली नाही असे उडवा उडीचे उत्तर घरकुल लाभार्थ्यांना देत आहे. नगर पालिकेने आतापर्यंत रखडलेले प्रधानमंत्री घरकुल योजनेची यादी व कुठलाच प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवला नाही. चिखली शहरातील जे नगरसेवक जनतेने निवडून दिले आहेत त्या नगरसेवकांनी घरकुल योजनेकडे पाठ फिरवली होती. लाभार्थ्यांनी आपले स्वतःचे राहते घर मोडून तेथे नवीन घर बांधायला सुरुवात पण केली ते सर्वच भाड्याच्या घरात राहून आपल्याला घरकुलाचा हप्ता मिळेल, त्या आशेवर जीवन जगत आहेत. काही लाभार्थी तर अक्षरशः जीवनालाच कंटाळलेले दिसतात व बोलूनही दाखवतात ही सरकारने आम्हाला घरकुलाचे स्वप्न दाखवून आमची चेष्टाच केली. घरकुल लाभार्थ्यांनी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष विजयकांत गवई, जिल्हा उपाध्यक्ष ब्रह्मा साळवे, जिल्हा महासचिव सलीम यांच्याशी संवाद साधला असता रिपब्लिकन सेनेने त्वरित नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याशी चर्चा करून प्रधानमंत्री घरकुल योजनेचे अनुदान देण्यात यावे, अशी मागणी बाबत मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. घरकुल अनुदान नाही मिळाले तर आम्ही रिपब्लिकन सेनेच्या वतीने नगरपालिकेच्या समोर आंदोलन करण्यात येईल असेही निवेदनात नमूद केले आहे.

निवेदन देतेवेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष विजयकांत गवई, जिल्हा महासचिव सलीम, जिल्हा उपाध्यक्ष ब्रह्मा साळवे, कामगार जिल्हाध्यक्ष सुरेश इंगळे, चिखली शहर अध्यक्ष सुनील सोळंके, शहर उपाध्यक्ष सतीश पवार, दीपक तायडे, शेख दानिश, सौरभ बावस्कर, अजय अंभोरे, विशाल काकफळे, विजय शिंदे, अमोल काकफळे, विकी निकाळजे, अक्षय शिंदे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.





# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पैठणला जय्यत तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील सर्व शासकिय कार्यालयातर्फे बुधवार दि.१० रोजी सकाळी 7 वाजता पैठण शहरात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपले नाव नोंदणीसाठी पैठण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस निरिक्षक किशोर पवार यांनी केले. यामध्ये साधरणता 165 युवकांनी सहभाग घेतला असल्याची माहिती पवार यांनी दिली.

शहरी व ग्रामीण भागात विविध उपक्रम राबवून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा पैठण तालुक्यात जागर केला जाणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून सामूहिक राष्ट्रगान तसेच पैठण शहरात मॅरेथॉन स्पर्धेचेही आयोजन केले असून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नाथसागर असा स्पर्धेचा मार्ग आहे. तसेच पैठण पंचायत समिती येथे शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सामुहिक राष्ट्रगीत घेण्यात आले. बुधवार रोजी होणाऱ्या कार्यक्रम याप्रसंगी पैठण पोलीस ठाण्यात याविषयी नियोजन करण्यात आले असून उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, मुख्याधिकारी संतोष आगळे, पोलीस निरीक्षक किशोर पवार, गटविकास अधिकारी डॉ.ओमप्रकाश रामावत, शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, व्यकंटी पापुलवार, अश्विन गोजरे, सर्व पत्रकार बंधूची उपस्थिती होती.

या उपक्रमात विविध सामाजिक संघटनेच्या प्रतिनिधींसह तसेच नागरिकांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# काय ती महातपुरी काय तो रस्ता काय ते रस्त्यातलं पाणी सगळंच ओके : सुदामराजे शिंगाडे

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** तालुक्यातील महातपुरी ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार चालू आहे. कोंडलेल्या नाल्या, रस्त्यात पडलेले खड्डे, रस्त्यावरील असलेले पाणी, गावाच्या बाजूने जाणारा गावातील रस्ता खड्डेमय व पाणीमय झाला आहे. गावातील बंद असलेली भारत निर्माण पेयजल योजना अंतर्गत असणारी पाण्याची टाकी रस्त्यात पाणी साचल्यामुळे दुर्गंधी निर्माण होत आहे व त्यामुळे डेंग्यूची साथ येण्याची पण शक्यता असून रोगराई पसरण्याची धोके आहेत आणि अनेक अशा खूप काही ज्या सरकारी योजना आहेत.

त्या खूप दिवसांपासून बंद पडलेल्या आहेत त्याकडे सरपंच व ग्रामसेवक यांनी जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे. ग्रामस्थ वारंवार ही सरपंच व ग्रामसेवकांना बोलवून या योजना अंतर्गत असलेल्या लवकरात लवकर चालू करा अशी विनंती केल्या तरी पण सरपंच आणि ग्रामसेवक उत्तरे देत नाहीत. आठ दिवसापूर्वी गावातील मेन रस्त्यात एक अचानकपणे एक खड्डा पडला. 10 ते 12 फूट हा खड्डा आहे. अचानक या खड्ड्यात कोणी मोटरसायकल घेऊन गेले किंवा कोणाचे लहान लेकरू पडले तर त्याला जिम्मेदार कोण राहील, तो खड्डा नेमका कोणाचा जीव गेल्यानंतर तुम्ही बुजवणार आहेत का असा सवाल सुदामराजे शिंगाडे यांनी ग्रामसेवक यांना केला आहे.



विशेष सांगायचं म्हटलं तर ग्रामसेवक गावाला आल्यापासून एकही ग्रामसभा किंवा मासिक सभा झालेली नाही, हीच दुर्दैव महातपुरीच ग्रामसेवकांनी जाहीरपणे उत्तर द्यावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे. लवकरात लवकर हा खड्डा व गावातील कोंडलेल्या नाल्या दुरुस्त कराव्या ही विनंती करण्यात येत आहे.



# अन्न व औषध प्रशासनाचा 'अन्न सुरक्षा सप्ताह'

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अन्न व औषध प्रशासन विभागाकडून ५ ते १२ ऑगस्टदरम्यान राज्यात अन्न सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त नागरिकांसाठी विविध स्पर्धा होणार आहेत. अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ हा ५ ऑगस्ट २०११ या दिवशी संपूर्ण भारतात लागू करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर 'अन्नसुरक्षा सप्ताह' उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. या सप्ताहाच्या उपक्रमातून 'सुरक्षित आहार देई आरोग्याला आधार' हा संदेश घरोघरी पोहोचवला जाणार असल्याची माहिती नाशिक विभागाचे सहआयुक्त गणेश परळीकर यांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर देशात तसेच राज्यात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्यात येत आहे. केंद्र शासनाचे "आझादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे अनुषंगाने राज्यातही सदर उपक्रम विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत आहे. "आझादी का अमृत महोत्सव" याचे औचित्य साधून तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ हा कायदा दि. ०५ ऑगस्ट २०११ या दिवशी अंमलात आल्याने व संपूर्ण भारतात एचक कायदा अंमलबजावणीसाठी लागू करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर, अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांचेकडून ०५ ऑगस्ट २०२२ ते १२ ऑगस्ट २०२२ या काळात राज्यात "अन्न सुरक्षा सप्ताह" साजरा करण्यात येत आहे.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

सदर "अन्न सुरक्षा सप्ताह" उपक्रम संपूर्ण राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी नाशिक विभागात अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांचेकडून, अन्न व्यावसायिक तसेच सामान्य जनतेसाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ या बाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विभागीय तसेच जिल्हा स्तरावर शिबिर/कार्यशाळा, वृत्तपत्र प्रकाशन, व्यसनमुक्ती शपथ, कमी तेल, मीठ/साखरेतील पाककृती स्पर्धा, VIDEOS, RADIO SPOTS/TALK तसेच पोस्टर्स यांचे माध्यमातून राज्यातील जनता तसेच अन्न व्यवसायिक यांच्यामध्ये जनजागृती करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सदर उपक्रमात शालेय विद्यार्थी, महिला, प्रतिष्ठीत नागरिक, विविध सेवाभावी संस्था व व्यापारी संघटना यांचा प्रामुख्याने सहभाग घेण्यात येणार असून, त्यामुळे प्रशासनाची भूमिका व कार्य सामान्य नागरिकापर्यंत पोहचून प्रशासनाचे समाजातील महत्व वृध्दींगत होण्यास मदत होणार आहे.

या अन्न सुरक्षा सप्ताहाच्या उपक्रमातून "सुरक्षित आहार देई आरोग्याला आधार" हा संदेश घरोघरी पोहाचवला जाणार आहे.

# नसरापूर वन विभाग व पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असो.ने घेतली सर्प जनजागृती कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**नसरापूर :** पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशन टीम कडून पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात, वाड्या वस्त्यांवर सर्प जनजागृती अभियान सुरू केले आहे. या अभियानाअंतर्गत काल श्री शिवाजी विद्यालय व ज्युनियर कॉलेज नसरापूर चेलाडी तालुका भोर, जिल्हा पुणे या शाळेत २०० विद्यार्थ्यांसाठी "सर्प जनजागृती कार्यशाळा" घेण्यात आली. प्रचंड उत्साहात या शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेस प्रतिसाद दिला.

या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे २ ऑगस्ट रोजी झालेल्या नागपंचमीच्या सणाला या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साप, नाग, घोणस यांच्या मातीच्या प्रतिकृती तयार केल्या होत्या. त्यामुळे या बालमित्रांनी भरपूर प्रश्न विचारून आम्हा सर्वांनाच आश्चर्याचा सुखद धक्का दिला. या शालेय वयातही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सापांच्या बद्दल बरीच माहिती होती. ही कार्यशाळा घेण्यासाठी श्री शिवाजी विद्यालय व ज्युनियर कॉलेज नसरापूर चेलाडी, भोर या शैक्षणिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाफाळे पी.एन., पर्यवेक्षक खोपडे, धेंडे, सुत्रसंचालन करणाऱ्या गोवेकर, पुजारी, शिरसाठ आणि आभार प्रदर्शन पुणेकर यांनी केले तसेच या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. नसरापूर वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी संग्राम जाधव, वनपाल नसरापूर नितीन खताळ, वनपाल कीकवी शाबुदिन शेख, वनपाल संगमनेर अरूण डाळ व वनरक्षक बी.एस. तांबे, भगवान तांबे, एन.एस.पगडे, अक्षय लव्हाळे, संध्या कांबळे, शितल साठे, संतोष भोरडे सहकार्य लाभले.

या कार्यशाळेसाठी पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष सुशील दादा विभुते, नसरापूर शहर अध्यक्ष श्रीकांत उर्फ सोनू खेडेकर, सनी कडके, विशाल शिंदे, स्वप्नील शिंदे, विलास धोंगडे, दीपक जाधव, विनायक मोहिते, संतोष पाटील, रोहन कोळी, साहिल गुतेदार, राहुल मालुसरे, विष्णु बोकफोडे, उषा लोहार उपस्थित होते. पावसाळयात साप बाहेर पडण्याचे प्रमाण वाढते त्यामुळे सर्वांनी योग्य ती काळजी घ्यावी व पूर्ण माहितीशिवाय कोणत्याही सापाला पकडण्याचा प्रयत्न करू नये. सापाला मारण्याचा प्रयत्न करू नये व साप चावल्यावर अघोरी उपाय करण्यात वेळ न घालवता त्वरित शासकीय रुग्णालयात दाखल होऊन पुढील उपचार घ्यावेत, असे आवाहन पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशन च्या टीमने शिक्षक, पालक, विद्यार्थी यांना केले आहे.



# कर्मचाऱ्यांनी केला तयार अनधिकृत बस थांबा

आधुनिक केसरी न्यूज



**प्रा. रमेश वाघमारे**

**पुसद :** उमरखेड - पुसद रोडवर शिळोणा घाटात राज्य परिवहन महामंडळाच्या चालक-वाहक यांनी अनधिकृत थांबा तयार केला. पुसद उमरखेड रोडवर गगनमाळ फाट्याजवळ शिळोणा घाटात निर्जनस्थळी असलेल्या हॉटेलवर राज्य प. मंडळाच्या बसेस थांबत असल्यामुळे उमरखेड, नांदेड, पुसद येथे जाणाऱ्या प्रवाशांना, विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

उमरखेड येथून उच्च शिक्षणासाठी पुसद येथे जाणारे असंख्य विद्यार्थी आहेत तसेच पुसदवरून येणारे कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. त्यांना या अनधिकृत थांब्यामुळे असंख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. अगदी 20 ते 30 मिनिटाच्या अंतरावर उमरखेड पुसद येथे सुसज्ज असे बसस्थानक असताना या ठिकाणी बसेस का थांबत आहे, हे प्रवाशांच्या समजण्यापलीकडे झाले आहे. या ठिकाणी निर्जन स्थळ असून घाटाचा परिसर आहे व बसेस अर्धा अर्धा तास थांबत असल्यामुळे प्रवाशांना, विद्यार्थ्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. या ठिकाणी लांब पल्ल्याच्या बस गाडया थांबत आहेत. वाहक चालकांना मोफत चहा, नाश्ता मिळत असल्याचे समजते. पण या लालसेपायी विद्यार्थ्यांच्या वेळा टळत आहेत. प्रवासी व विद्यार्थ्यांचे अनेक चालक वाहक यांच्यासोबत वादविवाद होत आहेत तरी रा.प.म. च्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी या ठिकाणचा अनधिकृत थांबा रद्द करावा तसेच या ठिकाणी बसेस थांबल्यास पोफाळी पोलीस स्टेशन यांनी कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे व सबंधित अधिकाऱ्यांनी याकडे गांभिर्याने लक्ष द्यावे.

# मक्रणपूर येथे जिल्हा परिषद शाळेत चिमुकल्यांसह सामूहिक राष्ट्रगान

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** भारताला स्वतंत्र होऊन 75 वर्ष पुर्ण झाल्याने अखंड भारत हा स्वातंत्र अमृत मोहत्सव साजरा होणार आहे. याच पार्श्वभूमीवर कन्नड तालुका पातळीवर घर घर तिरंगा 15 ऑगस्ट रोजीपर्यत स्वयंम स्फुर्तीने करावा, असे शासनाकडून सुचना आल्या आहे.

याच अमृत मोहत्सवानिमित्त कन्नड शहरालगत असलेल्या मक्रणपुर येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये राष्ट्रगाण घेण्यात आले असून प्रभात फेरी, रांगोळी स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध कार्यक्रम होणार आहेत. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर पवार, ग्रामविकास अधिकारी आनंद पगारे, शालेय समिती अध्यक्ष ताहेर शेख, उपसरपंच विनायक सोनवणे, सरपंच पती असलम शेख, शाळेतील शिक्षिका लता बडक, हर्षिता बैरागी, सुनीता निकम, सारिका जाधव, पूजा मिसर, जनशक्ती महिला आघाडीच्या आनिता शेजवळ, आशाताई मनिषा मगर, अंगनवाडी सेविका प्रतिभा पवार, अंगणवाडी मदतनिस व आसिप शेख, संजय गायकवाड व ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## लैंगिक समस्या निदान व उपचार...

आधुनिक केसरी

पेनाईल इम्प्लांट हे सिलिकॉनचे असतात आणि शस्त्रक्रियेच्या माध्यमातून ते लिंगामध्ये बसवता येतात. अतिशय लाभदाय अशा पद्धतीची ही शस्त्रक्रिया असून या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला अगदी नैसर्गिक पद्धतीने संबंध ठेवता येतात. या शस्त्रक्रियेचा संवेदान, वीर्य यावर कोणताही दुष्परिणाम होत नाही.

वंध्यत्व आणि नपुंसकता या समस्यांमुळे अनेक संसार तुटतात, गोष्ट घटस्फोटापर्यंत पोहोचते. नाहीतर फ्रस्ट्रेशन येऊन रोज भांडणं, वाद, मारहाण अशा वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. या दोन्ही समस्यांवर ठोस आणि कायमस्वरूपी उपाय उपलब्ध आहेत. मात्र त्यासाठी योग्य डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार घेणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा मी असं पाहिलेलं आहे की या समस्या केवळ संकोचापोटी दाबल्या जातात आणि कोणत्यातरी भोंदुवैद्याकडून कसले तरी रानटी उपचार घेतले जातात आणि समस्या सुटण्याऐवजी ती जटिल होत जाते. माझ्या वाचकांना माझी नम्र विनंती आहे की अशा फसव्या जाहीराती, भोंदूबाबा यापासून सावध राहावे.

**शीघ्रपतन :** पुरुषांमध्ये सर्वसामान्य पद्धतीने आढळणाऱ्या समस्यांपैकी ही आणखी एक कॉमन समस्या. प्रक्रिया पूर्ण होण्याआधी किंवा प्रक्रिया सुरू करण्यापूर्वीच वीर्यपतन होणे म्हणजे शीघ्रपतन. यामध्ये त्या व्यक्तीचे पतनावर नियंत्रण रहात नाही. या समस्येमागे प्रामुख्याने कौटुंबिक ताणतणाव, संबंधांमध्ये खूप अवधी लागणे, मूत्रमार्गाचे संसर्ग, प्रोस्टेट ग्रंथीचे विकार अशी ढोबळ कारणे सांगता येतात. शीघ्रपतनामुळे येणारे नैराश्य ही सुद्धा एक मोठी समस्या बनली आहे. आणि शीघ्रपतनासारख्या समस्येवर शंभर टक्के उपाय आहेत. मात्र त्यासाठी अशी समस्या असलेल्या रुग्णांनी पुढे येणे आणि योग्य अशा सेक्सॉलॉजिस्टला भेटून त्यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# नक्षत्रवाडी येथे क्रांतिदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संत कबीर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा आयु. विठाबाई माधवराव बोरडे, सचिव ॲड. धनंजय माधवराव बोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.9 रोजी संत कबीर विद्यालय नक्षत्रवाडी येथे क्रांतिदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कादरी आय.व्ही. यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक पवार एस.बी. व श्रीमती चव्हाण व्ही.एच. यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. क्रांतीदिनानिमित्त वकृत्व स्पर्धा, निबंध व चित्रकला या स्पर्धांचे आयोजन केले. तसेच विविध भागातून हर घर तिरंगा या कार्यक्रमांतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कादरी आय.व्ही. यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पाथ्रीकर डी.टी. व आभार कुलकर्णी एल.एम. यांनी केले. सदरील कार्यक्रमासाठी वकृत्व स्पर्धेत 31 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारांनी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in